दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

१ ते ३० नोव्हेंबर दरम्यान पाचवी राष्ट्रव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीम

मुंबई : केंद्र शासनाच्या पेन्शन आणि पेन्शनधारक कल्याण विभागामार्फत देशभरातील २,००० शहरे व जिल्ह्यांमध्ये १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पाचवी राष्ट्रव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र (डीएलसी) मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्र शासनाच्या पेन्शन आणि पेन्शनधारक कल्याण विभागाचे अवर सचिव दीपक गुप्ता यांनी मुंबई येथील अधिदान व लेखा कार्यालयास भेट दिली.राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनाचे वितरण नियमित सुरू राहण्यासाठी दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात हयातीचा सादर करणे आवश्यक असते. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी केंद्र शासनाच्या 'जीवन प्रमाण' प्रणालीद्वारे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे पात्र निवृत्तीवेतनधारकांना आधार आधारित बायोमेट्रिक किंवा फेस ऑथेंटिकेशनद्वारे मोबाईलच्या माध्यमातून डिजिटल जीवन प्रमाणपत्र तयार करून सादर करता येते.

*(आष्टी) वर्धा * शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ *वर्ष ४ थे *अंक २५६ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

ॲग्रीगेटर कंपन्यांसाठी अत्याधुनिक डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करावेत – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र ॲग्रीगेटर नियमावली- २०२६ संदर्भात बैठक



मुंबई : राज्यातील ॲप आधारित प्रवासी वाहतूक सेवा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि सुव्यवस्थित करण्यासाठी ?ग्रीगेटर कंपन्यांच्या वाहनांची, चालकांची आणि त्यांच्या कामाचे तास याची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणारा अत्याधुनिक डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करावा. या प्लॅटफॉर्मला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विश्लेषणाची जोड देऊन वाहनांचे संचालन, चालकांची नियुक्ती, पार्किंगची व्यवस्था आणि प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र ॲग्रीगेटर नियमावली-२०२६ संदर्भात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ?ग्रीगेटर क्षेत्रातील वाढती वाहन संख्या, स्वतंत्र टॅक्सीचालकांच्या समस्या, प्रवाशांची सुरक्षितता आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरील प्रवास वाटपातील पारदर्शकता या मुद्द्यांचा वर्षा निवासस्थानी आढावा घेतला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

वाहन आणि चालकांची संपूर्ण माहिती एका प्लॅटफॉर्मवर

ॲग्रीगेटर कंपन्यांकडून चालविल्या जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची नोंदणी, त्यासाठी वापरले जाणारे पार्किंगचे ठिकाण, संबंधित चालकाची माहिती, वाहन चालविण्याचा परवाना, पोलीस पडताळणी आणि अन्य आवश्यक कागदपत्रांचा तपशील डिजिटल स्वरूपात उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, दिवसभरात वेगवेगळ्या पाळ्यांमध्ये कोणता चालक कोणते वाहन चालवितो, याची अद्ययावत नोंद या प्रणालीत असावी. एखादी घटना घडल्यास संबंधित वाहन आणि चालकाची माहिती तातडीने उपलब्ध होईल, अशी सक्षम यंत्रणा उभारण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

या प्लॅटफॉर्मवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने वाहनांचे संचालन, चालकांच्या पाळ्या आणि अन्य महत्त्वाच्या बाबींचे विश्लेषण करता येईल. त्यामुळे नियमांचे पालन होत आहे की नाही, यावर देखरेख ठेवण्याबरोबरच आवश्यकतेनुसार संबंधित यंत्रणांना तातडीने कारवाई करणे शक्य होईल.

प्रवास वाटपातील पारदर्शकतेसाठी अल्गोरिदमचे परीक्षण

ॲप आधारित प्रवासी वाहतूक सेवांमध्ये स्वतंत्र टॅक्सीचालक आणि मोठ्या फ्लीट कंपन्यांच्या वाहनांना प्रवास वाटप करताना समान संधी मिळते की नाही, याची तपासणी करण्याची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. तसेच प्रवासी वाहतूक करणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर कोणत्या वाहनाला, कोणत्या कारणाने आणि कोणत्या निकषांवर प्रवास दिला जातो, याचे परीक्षण करता येणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. प्रवास वाटपामध्ये भेदभाव होत असल्यास तो ओळखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे त्यांनी निर्देश दिले.

प्रवाशांना सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा मिळण्यासोबतच स्थानिक चालकांना रोजगाराच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी नियमांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शक प्रवास वाटप आणि कंपन्यांच्या कामकाजावर तांत्रिक देखरेख या बाबींना प्राधान्य देण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील ॲग्रीगेटर क्षेत्राचा विस्तार आणि प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारी, सक्षम आणि गतिमान नियामक यंत्रणा विकसित करण्याची आवश्यकता आहे. स्वतंत्र टॅक्सीचालकांचे हित, प्रवाशांची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेतील शिस्त यांचा समतोल राखण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून प्रभावी नियंत्रण व्यवस्था उभारण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी परिवहन विभागाला दिले.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांत सुधारणा करण्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे निर्देश



मुंबई : अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

प्रोत्साहन भत्त्याच्या सुधारित निकषांबाबत कर्मचारी संघटनांच्या मागणी संदर्भात मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी पोषण, आरोग्य, पूर्वशालेय शिक्षण, उपस्थिती आणि गृहभेटी आदी निकषांच्या आधारे प्रोत्साहन भत्ता निश्चित करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी बैठकीस एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वॉ. रा. ठाकूर आदींसह अधिकारी उपस्थित होते. राज्यात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचे तसेच गर्भवती मातांच्या पोषणाची काळजी घेण्यासाठी १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना त्यांच्या कामाच्या गुणवत्तेनुसार अनुक्रमे ?१,५०० ते ?२,००० आणि रुपये ५०० ते रुपये १,००० प्रतिमाह प्रोत्साहन भत्ता १ ऑक्टोबर २०२४ पासून लागू करण्यात आला आहे.

यावेळी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या अतिरिक्त आहार योजना, आदर्श अंगणवाडी योजना आणि बेबी केअर किट योजना यांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात या योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंत्री तटकरे यांनी सूचना दिल्या.

आर्वी बाजार समितीतील अविश्वास ठराव फेटाळला

सहा संचालकांच्या अनुपस्थितीमुळे प्रस्ताव बारगळला सभापती संदीप काळे उच्च न्यायालयात जाणार



आर्वी : आर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रशांत वानखेडे यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव फेटाळण्यात आला. आवश्यक संख्याबळाची पूर्तता न झाल्याने हा प्रस्ताव मंजूर होऊ शकला नाही. त्यामुळे उपसभापती प्रशांत वानखेडे यांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

बाजार समितीचे सभापती संदीप काळे यांनी १६ संचालकांच्या स्वाक्षऱ्यांसह उपसभापती प्रशांत वानखेडे यांच्याविरोधातील अविश्वास ठराव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला होता. या प्रस्ताचाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने ३० ऑक्टोबर रोजी आर्वी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सुनावणी आयोजित केली होती. उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. यासाठी बाजार समितीच्या सर्व १८ संचालकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. सुनावणीच्या वेळी उपसभापती प्रशांत वानखेडे, सभापती संदीप काळे यांच्यासह १२ संचालक उपस्थित होते, तर सहा संचालक अनुपस्थित राहिले. नियमानुसार १८ सदस्यांच्या बाजार समितीत अविश्वास ठराव मंजूर होण्यासाठी दोन तृतीयांश म्हणजेच किमान १२ संचालकांचे आवश्यक संख्याबळ अपेक्षित होते. मात्र, प्रस्ताचाच्या बाजूने आवश्यक संख्याबळाची पूर्तता झाली नसल्याने अविश्वास ठराव मंजूर होऊ शकला नाही.या सुनावणीदरम्यान सभापती संदीप काळे यांनी आपली भूमिका मांडली. उपस्थित संचालकांमधून दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा आवश्यक असल्याचे त्यांचे म्हणणे होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांनी अविश्वास ठरावाचा प्रस्ताव फेटाळला.

दरम्यान, या घडामोडींनंतर ३० ऑक्टोबर रोजी बाजार समितीमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत सभापती संदीप काळे यांनी भूमिका स्पष्ट केली. अविश्वास ठरावाच्या सुनावणीला अनुपस्थित राहिलेल्या सहा संचालकांवर काही दबाव आला असावा, अशी शंका त्यांनी व्यक्त केली. अशा प्रकारामुळे लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे सांगत, या निर्णयाविरोधात विधिज्ञांचा सल्ला घेऊन उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणामुळे आर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीतील अंतर्गत राजकीय समीकरणे पुन्हा चर्चेत आली असून, सभापती संदीप काळे यांच्या पुढील कायदेशीर भूमिकेकडे बाजार समितीच्या वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

गुन्हे शाखेची कारवाई एक किलो गांजा दारू व अन्य मुद्देमाल जप्त.



हिंगणघाट : स्था.गु.शा. चे पथकास मुखबीरतर्फे मिळालेल्या खात्रीशीर खबरेवरून गोमाजी वार्ड येथे आरोपी हर्षल विनोद गिमेकर याचे राहते घरी रेड केला असता, तेथे त्याचे वडील विनोद पांडुरंग गिमेकर, वय ५२ वर्ष, व त्याचा चुलत भाऊ सुरज भिमसिंग चौके, वय २९ वर्ष, रा. प्रियंका कॉलनी शेगाव नाका अमरावती ह.मु. गोमाजी वार्ड असे हजर मिळून आले असून, त्यांचे राहते घराची झडती घेतला असता, घराच्या घरझडतीदरम्यान गांजा अंमली पदार्थ व देशी दारूचा माल तसेच आरोपीचे अंगझडती दरम्यान दोन मोबाईल मिळून आले. त्यांना सदर मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदरचा मुद्देमाल हा त्यांचे तिघांचे मालकिचा असल्याचे सांगितल्याने, ते तिघेही संगणमताने गांजा व दारू मालाची तस्करी करून विक्रीचा अवैध व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाले. कारवाई मध्ये आरोपींचे ताब्यातून ०१ किलो ११३ ग्रॅम गांजा अमली पदार्थ, देशी दारू, दोन मोबाईलसह जु.कि. ८,७,१५० रू चा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केले. तिन्ही आरोपींतांविरुध्द पो.स्टे. येथे एन.डि.पी.एस. व दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पसार आरोपी हर्षल गीमेकर याचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक श्री. सदाशिव वाघमारे, यांचे निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक श्री. विनोद चौधरी, स.पो.नि. आशिषसिंग ठाकुर, पो.अं अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, सागर भोसले, रवि पुरोहित यांनी केली.

राज्यभरातील १४७८७ आरोग्य कर्मचारी होणार कायम

वर्धा जिल्ह्यातील ३१३ कर्मचाऱ्यांचा सहभाग, शासन प्रशासनाचे आयटकने मानले आभार

वर्धा : राज्यभरातील १४७८७ आरोग्य कर्मचारी कायम होणार आहेत. यामध्ये वर्धा जिल्ह्यातील ३१३ कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे. याबद्दल शासन प्रशासनाचे आयटकने आभार मानले.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत २००५ पासून कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अनेक संप आंदोलन केलेत या आंदोलनाची प्रथम सुरुवात वर्धा जिल्ह्यातून झाली. त्यात नर्सेस यांचा सहभाग होता नंतर सर्व कॅडर्स सहभागी झालेत. दिलीप उटाणे यांच्या मार्गदर्शनात आयटक संलग्न कंत्राटी नर्सेस युनियननी समायोजनाच्या मागणी साठी आंदोलन केले.समायोजनाबाबत सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या कक्षात या विषयाबाबत जवळपास सहा बैठका झाल्या. १४ मार्च २०२४ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयात दुरुस्ती करून राज्यभरातील १४,७८७ कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणी देऊन २७ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तीन वर्षांच्या प्रतीक्षेत असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक प्रकारे दिवाळी भेट देण्यात आल्याने कंत्राटी आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.

मिनी मंत्रालयाच्या निवडणुकीचे संकेत ; न्यायालयाची निवडणुकांकरिता हिरवी झेंडी

आरक्षणाचे प्रकरणी मात्र न्यायालयात सुरूच राहणार



वर्धा : आरक्षणाची मर्यादा पार करण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकांवर दिलेली स्थगिती उच्च न्यायालयाने उठवली असून या निवडणुका घेण्याकरिता हिरवी झेंडी दिली आहे. गत आरक्षणात जी स्थिती आहे त्याच स्थितीत ही निवडणूक घेण्यासंदर्भात निर्देश देण्यात आल्याने जिल्हा परिषद, पंचयात समिती निवडणुकीचा मार्ग मोकळा झाल्याचे संकेत आहेत.

शिवाय आरक्षणासंदर्भात न्यायालयात दाखल असलेले प्रकरण सुरूच रहणार असल्याचे न्यायालयाकडून कळविण्यात आले आहे. निवडणूक ही लोकशाहीची प्रक्रिया असून ती का थांबवावी, असे सरन्यायाधीश्रांनी म्हणताच वर्ध्याच्या मनीमंत्रालयाच्या ५२ आणि पंयातयत समितीच्या १०४ जागांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. येथील जिल्हा परिषदेवर सुमारे पाच वर्षांपासून प्रशासक राज आहे. या पाच वर्षात दोन वेळा निवडणूक घेण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. आरक्षण काढण्यात आले. मात्र, ओबीसी आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने प्रकरण न्यायालयात गेले. त्यामुळे निवडणुकीवर पुन्हा स्थगिती आली. त्या काळापासून सर्वांना निवडणुकीची आशा लागली होती. अशात पालिका निवडणुका झाल्याने जिल्हा परिषदेची निवडणूक होईल असे वाटत असताना तिथेही आशा मावळली. दरम्यान न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे निवडणुकांचे बिगुल वाजण्याबाबत चर्चा आहे.

न्यायालयाने निर्देश देताना लवकरच निवडणूक जाहीर करून त्या तुलनेत मनुष्यबळाची व्यवस्था करा असे सूचित केले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक होणार असल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या आवारात सुरू झाली आहे. घेण्यात येणाऱ्या निवडणुका जुन्या आदेशानुसार व्हाव्या असे न्यायालयाने म्हटले आहे. शिवाय ओबीसी आरक्षणासंदर्भात सुरू असलेल्या सुनावणीच्या अधिन राहून ही निवडणूक घेण्याचे निर्देशही न्यायालयाकडून देण्यात आले आहेत. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकींच्या रिंगणात उतरण्याची इच्छा असलेल्यांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत.

ओबीसी आरक्षणावर सुनावणी राहणार सुरू

अनेक जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत ओबीसी आरक्षण ५० टक्क्यांच्यावर गेल्याने प्रकरण न्यायालयात गेले. त्यामुळे या आरक्षणसह होणार असलेल्या निवडणुकीवर स्थगिती देण्यात आली. गत पाच वर्षांपासून लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया रखडल्याने ग्रामविकासाला खोडा बसला होता. त्यामुळे ही प्रक्रिया होणे आवश्यक असल्याने ही निवडणूक घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वर्धा जिल्हा परिषदेवर भाजपची सत्ता

वर्धा जिल्हा परिषदेवर सध्या भाजपची एकहाती सत्ता आहे. मंत्रीपद असल्याने वर्धा जिल्हा परिषदेवर आपली सत्ता रहावी याकरिता महायुतीकडून कंबर करने सुरू झाले आहे. तर गेलेली सत्ता परत मिळावी याकरिता महाविकास आघाडी तयारीला लागली आहे. कधी कॉंग्रेसच्या ताब्यात असलेली ही जिल्हा परिषद भाजपने मिळविली. येत्या निवडणुकीत कॉंग्रेस आपली सत्ता मिळविण्याकरिता कामाला लागणार असल्याचे चिन्ह आहेत.

संपादकीय

सुधारित 'भविष्य निर्वाह निधी' योजना आणि कर्मचारीहित



नुकतीच 'भविष्य निर्वाह निधी' अंतर्गत कर्मचाऱ्यांची पात्रता मर्यादा दरमहा १५ हजार रुपयांहून २५ हजार रुपयांपर्यंत वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारतर्फे जाहीर करण्यात आला. त्यानिमित्ताने एकूणच या निर्णयाचे कर्मचारीवर्गाला, कंपन्यांना होणारे लाभ, त्याचे संभाव्य परिणाम यांचा ऊहापोह करणारा हा लेख...

केंद्र सरकारने नव्याने घेतलेल्या निर्णयानुसार, 'भविष्य निर्वाह निधी' अंतर्गत कर्मचाऱ्यांची पात्रता मर्यादा दरमहा १५ हजार रुपयांहून २५ हजार रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे पगारदार कर्मचारी-कामगार व त्यांचा पगार-उत्पन्न आणि बचत याशिवाय कंपन्या व व्यवस्थापनावर विविध प्रकारे होणार असल्याने त्यावर विविध प्रकारे प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते.

सकृतदर्शनी 'भविष्य निर्वाह निधी' योजनेतील या वेतनवाढीच्या निर्णयामागे कामगार-औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना त्यांच्या भविष्यकालीन सामाजिक सुरक्षेची सुनिश्चितता प्रदान करणे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परिणामी, आधीच्या दरमहा १५ हजार रुपयांपर्यंत वेतन प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या 'भविष्य निर्वाह निधी' योजनेची मर्यादा आता मासिक २५ हजार रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. याचाच स्वाभाविक परिणाम नव्याने व मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना 'भविष्य निर्वाह निधी' योजनेत सामील केले जाणार आहे.

नवीन निर्णयानुसार, 'भविष्य निर्वाह निधी' योजनेअंतर्गत समाविष्ट असणाऱ्या व सध्या मासिक २५ हजार रु. वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीतील सध्याचे दरमहा १ हजार ८०० रु. असणारे योगदान यापुढे तीन हजार रु. होणार असून व्यवस्थापनाकडे कर्मचाऱ्यांच्या 'भविष्य निर्वाह निधी' खात्यांतर्गत देय असणारे योगदान दरमहा ५०० रुपयांहून ९१७ रुपयांपर्यंत वाढणार असून, अशा प्रकारे या कर्मचाऱ्याच्या 'भविष्य निर्वाह निधी' खात्यात आता दरमहा ३ हजार ९१६ रुपयांची भर पडणार आहे. वरील उदाहरण केवळ वानगीदाखल नमूद केले आहे.

यासंदर्भात 'भविष्य निर्वाह निधी संघटने'ने जारी केलेल्या धोरणात्मक खुलाशानुसार, योजनेतील नव्या निर्देशानुसार व्यवस्थापनावर पडणाऱ्या व कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या एकूण एकत्रित वेतन(पे टू दू प मदर्स्ड्रेक) देण्यासाठी येणारा अतिरिक्त आर्थिक भार कंपनी-व्यवस्थापनाने वहन करायचा आहे. याचा उद्देश नव्या दराने 'भविष्य निर्वाह निधी'च्या वाढीव रकमेची पूर्तता करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या मासिक देय वेतनात कपात होऊ नये, हा असल्याचे सांगण्यात आले आहे.

विख्यात व्यवस्थापन सल्लागार कंपनी असणाऱ्या 'अर्न्स्ट अँण्ड यंग'चे विशेष सल्लागार पुनीत गुप्ता यांच्यानुसार 'भविष्य निर्वाह निधी' योजनेची व्याप्ती कर्मचाऱ्यांच्या १५ हजार रु. दरमहा वेतनापासून २५ हजार रु. करणे, ही बाब देशांतर्गत औद्योगिक क्षेत्रातील कामगार-कर्मचाऱ्यांना उपलब्ध असणाऱ्या सामाजिक सुरक्षा व्यवस्थेला अधिक व्यापक व्याप्ती प्रदान करणारी ठरणार आहे. त्यांच्या मते, या नव्या सरकारी निर्णयामुळे संघस्थितीतील औद्योगिक कर्मचाऱ्यांचे वेतनमान, महागाई व आर्थिक-व्यावसायिक परिस्थिती पाहता, सरकारचे हे धोरण मूलगामी असून त्याचे दूरगामी परिणाम होण्यासारखे आहेत.

'कस्टोडियन' या व्यवसाय मार्गदर्शन कंपनीचे संस्थापक कुणाल कावरा यांच्यानुसार, वाढीव 'भविष्य निर्वाह निधी'चे नियम व योगदानामुळे दरवर्षी मोठ्या संख्येत सेवानिवृत्त होणाऱ्या निवृत्त कर्मचारी व ज्येष्ठ नागरिक यांची आर्थिक स्थिती व निवृत्तीनंतरचे जीवनमान सुधारण्यास निश्चितपणे मदत होणार आहे. आगामी काळात अशा निवृत्तिधारकांच्या संख्येत होणाऱ्या वाढीवर त्यांनी प्रकाश टाकला असून, यापुढील वाढीव निवृत्तिवेतन त्यांच्यासाठी विशेष लाभदायी ठरण्यावर भर दिला आहे.


अर्थात, 'भविष्य निर्वाह निधी' योजनेतील रक्कमवाढीची ही माया काही आनुषंगिक आर्थिक परिणामापण करणारी आहे. याचे मुख्य परिणाम 'भविष्य निर्वाह निधी' योजनेअंतर्गत सदस्य कर्मचाऱ्यांना उपलब्ध असणाऱ्या कर्मचारी पेन्शन व कर्मचारी योगदान विमा योजना (EDLI) या योजनांवरसुद्धा होणार आहे. याचा अतिरिक्त आर्थिक भारसुद्धा व्यवस्थापनाला उचलावा लागणार आहे.

व्यवस्थापन विभागाचे प्रमुख केतन दास यांच्या मते, आता सरा लाख रुपये सकल वार्षिक उत्पन्न असणारे कर्मचारी 'भविष्य निर्वाह निधी' योजनेत समाविष्ट होतील. देशांतर्गत नव्याने नोकरी-करिअर सुरू करणाऱ्या अधिकांश नव्या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश असेल. प्रत्यक्षात ज्यांचे मूळ वेतन दरमहा २५ हजार रुपयांहून अधिक असेल, असे कर्मचारी मात्र 'भविष्य निर्वाह निधी'च्या कक्षेबाहेर असतील.

'भविष्य निर्वाह निधी' योजनेच्या अंतर्गत असणारी निवृत्ती-पेन्शन योजना ही नेहमीच चर्चेचा विषय ठरली आहे. या योजनेअंतर्गत असणारी कुटुंब निवृत्तिवेतन, म्हणजेच 'फॅमिली पेन्शन'ची रक्कम तुटपुंजी असल्याची तक्रार नेहमीच केली जाते व अशी तक्रार सातत्याने करणाऱ्यांची संख्याही मोठी असते. नव्या 'भविष्य निर्वाह निधी' व त्याअंतर्गतच्या वाढत्या पेन्शनधारकांमुळे तक्रारकर्त्यांची संख्या नक्कीच वाढू शकेल.

याशिवाय, कर्मचारी भविष्य निधी पेन्शन योजनेच्या पूर्वापार निर्धारित कालावधीत काही बदल न झाल्याने योजनेअंतर्गत दहा वर्षे नोकरीसह 'पीएफ' सदस्यत्वाची अट पूर्ण करणाऱ्यांनाच पेन्शनचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे अर्थातच या कालावधीची पूर्तता न करणारे सदस्य कर्मचारी या योजनेपासून वंचित राहणार, हे पुन्हा स्पष्ट झाले आहे. या पेन्शन योजनेअंतर्गत सदस्य-कर्मचाऱ्याच्या पेन्शन खात्यात जमा होणाऱ्या रकमेवर व्याज मिळत नाही; त्यामुळे वाढत्या मुद्रास्फितीच्या पार्श्वभूमीवर तर जमा होणारी रक्कम व त्यातून पात्रताधारक कर्मचाऱ्याला मिळणारी पेन्शन, याचे प्रत्यक्ष आर्थिक मूल्य व त्याची भविष्यकालीन उपयुक्तता या दोन्ही बाबी संबंधित कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी नेहमीच काळजीचा विषय ठरणार आहेत.

राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल!



भारताची विविधता हीच भारताची ताकद आहे. भाषा वेगवेगळ्या, संस्कृती वेगवेगळ्या, परंपरा वेगवेगळ्या; धर्म वेगवेगळे मात्र देश एक आहे. ही एकात्मता केवळ भावनिक पातळीवर टिकवून ठेवायची नसते, तर त्यासाठी दूरदृष्टी, संघटन कौशल्य, बंधुता, निर्णयक्षमता आणि प्रसंगी कठोर भूमिका घेण्याची तयारीही आवश्यक असते. भारताच्या इतिहासात या गुणांचा प्रभावी प्रत्यय देणारे नेतृत्व म्हणजे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल. म्हणूनच त्यांची जयंती ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकता दिवसाची सुरुवात कधी झाली

भारत सरकारने २०१४ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. २२ ऑक्टोबर २०१४ रोजी केंद्र शासनाने या निर्णयाची घोषणा केली. त्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने २४ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिवसाच्या आयोजनासंदर्भात अधिकृत प्रसिद्धिपत्रक जारी केले. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी पहिला राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी एका आदेशाद्वारे त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करताना राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्याचे निर्देशित केले आहे. शौक्षणिक संस्थांमध्ये वक्तृत्व, निबंध, नाटीका, व्याख्याने, आयोजित करण्याचे स्पष्ट केले आहे.

सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान आणि स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलीनीकरण करून भारताची एकात्मता दृढ करण्यासाठी केलेले ऐतिहासिक कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश होता. या दिवशी 'रन फॉर युनिटी', राष्ट्रीय एकतेची शपथ आणि संचलन यांसारख्या उपक्रमांद्वारे देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याचा संदेश दिला जातो. म्हणजेच हा दिवस केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा नसून, राष्ट्रच्या एकात्मतेप्रती आपली जबाबदारी पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नातून घडलेले नेतृत्व

३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमधील नडियाद येथे जन्मलेल्या वल्लभभाई पटेल यांनी म्हणजे अधिकार गाजवण्याचे साधन नसून, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी आहे, हा दृष्टिकोन त्यांच्या कामातून दिसतो. पुढे या अहमदाबाद नगर पालिकेचा अध्यक्ष देशाचा लोहपुरुष म्हणून नावलौकिकास आला.

१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत आणि १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यलढ्यातील सहभागामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. संघटनकौशल्य, निर्णयक्षमता आणि जनतेला एकत्र आणण्याची क्षमता या गुणांच्या बळावर ते राष्ट्रीय चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी एक बनले.

स्वातंत्र्यानंतरची ऐतिहासिक जबाबदारी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; पण स्वातंत्र्य मिळाले म्हणजे देशाची राजकीय एकात्मता पूर्ण झाली, असे नव्हते. त्या वेळी ब्रिटिश भारताबरोबरच ५६० हून अधिक संस्थाने अस्तित्वात होती. ब्रिटिश सत्तेचा अंत झाल्यानंतर या संस्थानांच्या भवितव्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला. अनेक संस्थानांचे स्वतंत्र राहण्याचे किंवा भारत-पाकिस्तान यांपैकी एखाद्या देशात सामील होण्याचे पर्याय विचाराधीन होते. अशा परिस्थितीत भारताचे राजकीय विभाजन टाळणे, हे नव्या नेतृत्वापुढील मोठे आव्हान होते.

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री म्हणून सरदार पटेल यांनी संस्थानांच्या विलीनीकरणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. व्ही. पी. मेनन यांच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने त्यांनी संस्थानिकांशी चर्चा, समजूत, मुत्सद्देगिरी आणि परिस्थितीनुसार ठाम प्रशासकीय निर्णय यांचा वापर केला. त्यांच्या नेतृत्वामुळे विविध संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होण्याची प्रक्रिया पुढे गेली. हे काम केवळ राजकीय करारांचे नव्हते; भारताच्या भविष्यातील भौगोलिक अखंडतेचा आणि प्रशासनाच्या स्थैर्याचा तो पाया होता.

जुनागढ आणि हैदराबाद : निर्णयक्षमतेची कसोटी

जुनागढच्या संस्थानाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा भारताच्या भौगोलिक आणि राजकीय हितांचा विचार करून पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. पुढे हैदराबाद संस्थानाच्या भारतातील विलीनीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरला. वाटाघाटी आणि प्रयत्नांनंतरही प्रश्न सुटत नसल्याने सप्टेंबर १९४८ मध्ये 'ऑपरेशन पोलो' ही पोलीस कारवाई करण्यात आली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादच्या विलीनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. या घटनांमधून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नावर त्यांनी मुत्सद्देगिरीसोबतच आवश्यक तेव्हा कठोर निर्णय घेण्याची तयारीही दाखवली.

संस्थानांच्या विलीनीकरणाबरोबरच स्वतंत्र भारताची प्रशासकीय चौकट सक्षम करण्यावरही पटेल यांनी भर दिला. अखिल भारतीय सेवांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. देशाच्या विविध भागांत प्रशासनाची सातत्यपूर्ण आणि समन्वयित यंत्रणा कार्यरत राहणे, हे राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती.

एकसंघ भारताची पायाभरणी

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर भारतासमोर केवळ परकीय सत्तेतून मुक्त होण्याचे आव्हान नव्हते; तर अनेक संस्थाने, विविध राजकीय हितसंबंध आणि अनिश्चित भविष्य यांना एकाच राष्ट्रीय चौकटीत आणण्याचेही आव्हान होते. अशा निर्णायक काळात सरदार वल्लभभाई पटेल यांनी दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, धैर्य आणि ठाम निर्णयक्षमतेच्या बळावर संस्थानांच्या विलीनीकरणाला गती दिली. त्यामुळे आधुनिक भारताच्या राजकीय एकात्मतेचा पाया अधिक भक्कम झाला. आज आपण एकसंघ भारताचे नागरिक म्हणून अभिमानाने उभे आहोत, त्या ऐतिहासिक प्रक्रियेत सरदार पटेल यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. म्हणूनच त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करणे, हा इतिहासाचा गौरव करण्याबरोबरच भारताची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याच्या संकल्पाचे नूतनीकरण करण्याचा दिवस आहे.

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
९७०२८५८७७७

सूड ..

भोवले स्पष्ट बोलणे
श्रेष्ठी उगवतात सूड
चुकींचेधोरणाबद्दल
बसेपाठीवर आसूड

दुर्जांना हलवू पाही
स्वताचे स्थीर न बूड
इतरांच्या घरामध्येचं
करत राहती लुडबुड

निंदा उपमर्द चालले
किती करी हाडतूड
आम्हांवर लादे चुका
कळेना हे कसले गूढ

कशी सांभाळी मर्जी
सतत बदलणारे मूड
सल्ल्या दिला शहाणा
होतो मुर्खतखोर मूढ

मोडायची नाही कधी
रे नियम परंपरा रूढ
दोष दाखवायचेनाही
गायचे स्तुतीचे भारुड

निष्ठावान बनले कृष
परिवारझालायं सुदूढ
डोळ्यासमोर अन्याय
पहात राहती दिकमुढ

चमचे करी चीव चीव
श्रेष्ठी मनावरी गारुड
कायपाडणार पाऊस
शुभ्र ढगावरी आरूढ

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

ऑर्डर ..

ऑर्डर ऑर्डर दटावणे
जोरात बसला दंडका
वाट पाहतो ऑर्डरची
यंत्रणा बसली थंड का

बुलेटसंपल्या केंव्हांच
हाती रिकाम्या बंदुका
पुरावे मागतात किती
कमी पडल्या संदुका

पदप्रक्षाळण करेअति
झिजून गेल्या पादुका
प्रत्येक मनात विचार
माझामतलब साधूका

ऐकलेले होते कितीदा
कोर्ट पायरी चढू नका
का नडलाअतिउत्साह
केल्यापुनः त्याचं चुका


वकील भरतात खिसे
खाता अक्राडखोराका
कोण देणारसल्ल्या तो
थोडेतरी रे पुढे सरका

फास्ट ट्रॅक न्यायालये
मारला असूदे शिक्का
मार धक्क्यावरधक्का
मिळवण्यास्तव हक्का

न्यायदेवता रे आंधळी
पक्षकार बहिरा मुका
कॅलेडर्स संपले तरीही
पडताट पुढील तारखा

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६.

अध्यात्म शक्तीला राष्ट्र निर्मितीशी जोडणारे संत



भारतीय संतपरंपरेने अध्यात्मासोबतच समाजप्रबोधन, समता आणि मानवतेची मूल्ये जपली आहेत. या परंपरेला आधुनिक राष्ट्रनिर्मितीची दिशा देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकातील एक लोकोत्तर व्यक्तिमत्त्व होते. स्वातंत्र्य मिळविणे हे राष्ट्रनिर्मितीचे अंतिम उद्दिष्ट नसून, स्वतंत्र भारताला समताधिष्ठित, स्वावलंबी, एकात्म आणि समृद्ध बनविणे ही खरी जबाबदारी आहे, याची जाणीव त्यांनी समाजाला करून दिली. म्हणूनच त्यांचे कार्य केवळ संतपरंपरेपुरते मर्यादित न राहता नवभारताच्या उभारणीशी जोडले गेले.

आज त्यांच्या पुण्यतिथीला त्यांना अभिवादन करताना त्यांनी निर्माण केलेल्या आदर्शांवर समाजाने आणि समाजातील संत समुदायाने वाटचाल करणे आवश्यक वाटते. या भारताच्या नवनिर्माणासाठी कोणत्याही काळामध्ये या टिकाणच्या सज्जनशक्तीने एकत्रित येणे आवश्यक वाटते.

स्वातंत्र्यानंतर संघटन करण्याचा ध्यास

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सामाजिक विषमता, धर्माधर्मातील असंतोष, निरक्षरता, ग्रामीण दारिद्र्य, जातिभेद आणि राष्ट्रीय एकात्मतेची आव्हाने होती. या परिस्थितीत समाजाच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या संतांनी राष्ट्रनिर्मितीच्या कामात सक्रिय सहभाग घ्यावा, अशी भूमिका तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मांडली. या भूमिकेला राष्ट्रव्यापी करण्याचे ध्येय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी घेतले. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याशी संबंधित चरित्रपर संदर्भातूनही राष्ट्रसंतांच्या कार्याला मिळालेल्या राष्ट्रीय मान्यतेचे महत्त्व स्पष्ट होते. राष्ट्रपती भवनातील त्यांच्या खंजिरी भजनाने आणि राष्ट्रभक्तिपर विचारांनी त्यांचे कार्य राष्ट्रीय स्तरावर पोहोचले.

संतांचा प्रभाव केवळ धार्मिक श्रद्धेपुरता न राहता तो लोकशिक्षण, सामाजिक परिवर्तन आणि देशसेवेसाठी उपयोगात यावा, हा त्यांच्या कार्याचा गाभा होता. देशभरातील संतांना व्यापक राष्ट्रहिताच्या कार्यासाठी एकत्र आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना १९५६ मध्ये महत्त्वाचे वळण मिळाले. दिल्ली येथे विविध आखाड्यांतील, राज्यातील, धर्मपीठातील धर्माचार्य आणि संतांच्या सहभागातून भारत साधू समाजाची स्थापना झाली. गुरुकुंज आश्रमाच्या जीवनदर्शनविषयक नोंदीनुसार, या संस्थेच्या स्थापनेत राष्ट्रसंतांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि त्यांची प्रथम अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. संतशक्तीला संघटित सामाजिक कार्याची दिशा देणाराहा प्रयत्न त्यांच्या राष्ट्रनिर्माणविषयक दृष्टिकोनाचा महत्त्वाचा आविष्कार होता.

संत कसा असावा. भारताच्या नवनिर्माणात संतांची भूमिका कशी सर्वसमावेशक असावी, याचा वस्तुपाठ राष्ट्रसंतांनी आपल्या साहित्यातून घालून दिला आहे.

स्वातंत्र्यलढ्यातून राष्ट्रभक्तीची प्रेरणा

राष्ट्रसंतांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात भजन आणि कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती केली. १९४२ च्या भारतछोडो आंदोलनाच्या काळात त्यांच्या राष्ट्रभक्तिपर रचनांनी जनमानसात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली. चिमूर, आष्टी, यावली या भागात राष्ट्रसंतांच्या शब्दांनी राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतविले. आते है नाथ हमारे या भजनातील 'झाडझाडुले शस्त्र बनेगी! भक्त बनेगी सेना, पत्थर सारे बॉम्ब बनेगी, नाव लगेगी किनारे ' यासारख्या स्फूर्तिगीतांनी ग्रामीण भागातील जनतेला आंदोलनाशी जोडण्याचे काम केले. ब्रिटिश सत्तेने त्यांना अटक केली आणि तुरुंगवासही भोगावा लागला.

त्यांनी लोकभाषेचा, लोकसंगीताचा आणि गावागावातील जनसंपर्काच्या प्रभावी माध्यमांचा उपयोग राष्ट्रीय जाणीव जागविण्यासाठी केला. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्तता नव्हे; तर समाजातील अन्याय, अज्ञान आणि विषमतेतूनही मुक्तता होती.

ग्रामविकासातून राष्ट्रविकासाचा मार्ग

भारत हा खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांची प्रगती झाल्याशिवाय देशाची सर्वांगीण प्रगती शक्य नाही, हीराष्ट्रसंतांची ठाम धारणा होती. याचविचारातून त्यांनी ग्रामगीता हा ग्रंथ लिहिला. ग्रामस्वच्छता, शिक्षण, श्रमप्रतिष्ठा, सहकार, व्यसनमुक्ती, नैतिकता, स्वावलंबन आणि लोकसहभाग या घटकांचा समन्वय साधणारा हा ग्रामविकासाचा विचार आहे.

गाव हा विश्वाचा नकाशा, गावावरूनदेशाचीपरीक्षाहीत्यांच्या विचारांची दिशा स्पष्ट करणारी ओळ आहे. ग्रामविकास हा केवळ रस्ते, पाणी आणि इमारतींचा निर्मितीपुरता मर्यादित नसून गावातील माणसांच्या विचारांत, आचरणात आणि परस्पर संबंधांत परिवर्तन घडविण्याची प्रक्रिया आहे, असे त्यांच्या कार्यातून दिसते.

१९३५ मध्ये स्थापन केलेल्या गुरुकुंज आश्रमाच्या माध्यमातून त्यांनी समाजसेवा, सामुदायिक प्रार्थना आणि विधायक उपक्रमांना चालना दिली. अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून ग्रामोन्नतीचा विचार व्यापक जनसमुदायापर्यंत पोहोचविला. गावकऱ्यांनी स्वतःच्या विकासाची जबाबदारी स्वीकारावी आणि श्रमदानातून सामूहिक प्रगती साधावी, हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा संदेश होता.

संकटकाळातील राष्ट्रसेवा आणि राष्ट्रीय एकात्मता

राष्ट्रनिर्मिती म्हणजे केवळ विकासाच्या योजना नव्हेत, तर संकटाच्या वेळी देशबांधवांच्या मदतीला धावून जाणेही होय. बंगालच्या दुष्काळाच्या काळात, १९६२ मधील चीनच्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर, कोयना भूकंपानंतर आणि १९६५ मधील पाकिस्तानच्या आक्रमणाच्या काळात राष्ट्रसंतांनी मदतकार्य व जनजागृतीच्या माध्यमातून राष्ट्रसेवेचा आदर्श घालून दिला. त्यांचे कार्य अध्यात्म आणि कृती यांच्यातील अंतर मिटविणारे होते. अध्यात्मिक गुरूंनी, संतांनी, अध्यात्मिक प्रबोधनकारांनी समाज जागृती करताना देशाला अन्य कोणत्याही बाबींपेक्षा महत्त्व देणे आणि बंधुता जपणे आवश्यक असल्याचे सांगून जातात.

जात, धर्म, पंथ आणि भाषेच्या पलीकडे जाऊन भारतीय समाजात बंधुभाव निर्माण करणे, हे त्यांच्या राष्ट्रनिर्मितीच्या संकल्पनेचे मूलभूत सूत्र होते. सामुदायिक प्रार्थनेतून त्यांनी सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. या भारतात बंधुभाव नित्य वसु देण्दे वरची असा दे', ही त्यांची प्रार्थना राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला अभिव्यक्त करते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूरचे विद्यापीठ गीत हे त्यांचे हेच लोकप्रिय भजन आहे. राज्यघटनेत व्यक्त केलेल्या बंधुता या अपेक्षेला आपल्या प्रबोधनात मांडणारा राष्ट्रसंतांसारखा संत होणे नव्हे. अध्यात्मिक गुरूंनी किती सर्वसमावेशी असावेत, यासे उदाहरणही त्यांनी त्यांच्या वागणूतून घालून दिले आहे.

विश्वशांती परिषदेत बंधुभावाचा प्रचार

१९५५ मध्ये जपानमध्ये आयोजित जागतिक धर्मपरिषद आणि विश्वशांतीविषयक परिषदांमध्ये सहभाग घेऊन त्यांनी मानवता आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देशाबाहेरही पोहोचविला. राष्ट्रनिर्मितीचा त्यांचा विचार भारताच्या सीमांपुरता मर्यादित नव्हता; तो विश्वशांतीच्या व्यापक मूल्यांशी जोडलेला होता. संत ज्ञानेश्वराच्या बंधुभावाच्या पसायदानाला त्यांनी आपल्या खंजिरीची साथ दिली. जपान मध्येही त्यांनी विश्वबंधुत्वाचा नारा देत जगातील सत्त्वद्वतीना एकत्रित आणण्याचे जागतिक कार्य केले.

नवभारतासाठी आजही मार्गदर्शक विचार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनातून जनजागृती केली, संघटनातून समाजसेवेची शक्ती उभी केली आणि ग्रामगीतेतून ग्रामविकासाचा विचार मांडला. संतशक्तीला विधायक राष्ट्रकार्यात सहभागी करून घेणे, सामान्य माणसाला विकासाचा सक्रिय भागीदार बनविणे आणि सामाजिक एकात्मतेतून राष्ट्राची उभारणी करणे, ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये होती. आज विकसित भारताच्या संकल्पनेत ग्रामविकास, नागरिकांचा सहभाग, सामाजिक एकात्मता आणि स्वावलंबन यांना महत्त्व आहे. या सर्व मूल्यांचा आग्रह राष्ट्रसंतांनी आपल्या कार्यातून अनेक दशकांपूर्वी धरला होता. त्यांच्या पुण्यतिथीला त्यांचे स्मरण करताना त्यांच्या विचारांना केवळ गौरवोद्गारांपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष कृतीत आणणे आवश्यक आहे.

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर्स, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNINO : MAHMAR/2022/82242

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळणार – मंत्री पंकजा मुंडे

मंत्रिमंडळ उपसमितीच्या अभ्यासगटाच्या बैठकीत चाऱ्याचे दर निश्चित ; पशुपालकांना दिलासा दुष्काळ जाहीर कालावधीत सुधारित आधारभूत दर लागू ; सुका चारा प्रतिकिलो कमाल १२ रुपये; मुरघासासाठी कमाल ८ रुपये



मुंबई : दुष्काळजन्य परिस्थितीतील संभाव्य चारा टंचाईवर मात करून पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने चारा खरेदीचे दर निश्चित केले आहेत. पशुधनासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्याची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो १२ रुपये, तर मुरघासाची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो ८ रुपये निश्चित केली आहे, अशी माहिती पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. चाराटंचाईच्या काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांना यामुळे मदत होणार आहे.

राज्यातील खरीप हंगामातील परिस्थितीचा आढावा घेऊन आतापर्यंत एकूण ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटात पंकजा मुंडे सदस्य असून या अभ्यास गटाने राज्यासह इतर राज्यांमधील चारा व्यवस्थापनाच्या उपाययोजनांचा अभ्यास करून उपलब्ध चारा, संभाव्य उत्पादन आणि आगामी काळातील गरज लक्षात घेऊन अहवाल सादर केला. या अहवालाला २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मदत व पुनर्वसन विभागाने जाहीर केलेल्या दुष्काळाच्या कालावधीसाठी हे दर लागू राहतील. जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समितीने अभ्यासगटाच्या अहवालातील तरतुदी आणि मदत व पुनर्वसन विभागाच्या निर्देशानुसार चारा खरेदीची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच वाहतुकीसाठी परिवहन आयुक्तांनी वेळोवेळी निश्चित केलेले दर लागू राहतील. चाऱ्याच्या गुणवत्तेबाबतही शासनाने निकष निश्चित केले आहेत. खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्यातील ओलावा कमाल १५ टक्के असावा. चारा चांगला दिसणारा तसेच आंबट किंवा कुबट वास, बुरशी, कीड आणि माती नसलेला असावा. ज्वारी आणि बाजरीच्या चाऱ्याला प्राधान्य देण्यात येणार आहे. मुरघास हवाबंद आणि बुरशीमुक्त असणे आवश्यक आहे. त्यामधील ओलावा ६२ ते ७० टक्के, पीएच ३.५ ते ४.४ आणि क्रूड प्रोटीन किमान ७ टक्के असावे. अन्य घटकांसाठी भारतीय मानक ब्युरोच्या आयएस १९५६२ : २०२६ मधील निकष लागू राहतील.

पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळणार

राज्यातील दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांसमोर शेतीबरोबरच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होतो. पशुधन हे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन असल्याने दुष्काळाच्या काळात त्यांना चारा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. याच उद्देशाने सुका चारा व मुरघासासाठी आधारभूत दर निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ चाऱ्याचे दर निश्चित करणे एवढाच या निर्णयाचा उद्देश नसून, पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळावा, यासाठी गुणवत्तेचे निकषही ठरविण्यात आले आहेत. जिल्हास्तरावर योग्य नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणी करून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.


ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कृष्णदेव काकासाहेब थोरात यांना वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर

विशेष प्रतिनिधी/ कैलास गायकवाड

पिंपरी चिंचवड (भोसरी) येथील सामाजिक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री कृष्णदेव काकासाहेब थोरात पिंपरी चिंचवड यांना तथागत बहुउद्देशीय संस्था मेहकर द्वारा आयोजित तथागत बुध महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने वीर शिवछत्रपती महाराष्ट्ररत्न राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. श्री थोरात यांचे सामाजिक कार्यामध्ये मोठे योगदान असून, शैक्षणिक क्षेत्रामध्ये निराधार, दिव्यांग, एकल पालक, विद्यार्थ्यांना मदत, वृद्धाश्रम, महिला मुलींना सर्व प्रकारचे मदत , विविध प्रकारचे आरोग्य शिबिरे , संत ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराजांच्या दिंडी सोहळ्यामध्ये अन्नदान, आरोग्य मदत, साफसफाई , अध्यात्मक क्षेत्रामध्ये किर्तन सप्ताह, विविध प्रकारचे जनजागरण संवाद, प्रवचने, कामगारांसाठी शैक्षणिक प्रकल्प, वंचित व गरजूंना विविध प्रकारच्या शासकीय सुविधा मिळवून देणे, तसेच महिलांकरता आरोग्य शिबिरे राजगार मेळावे, गरजू व गरीब कुटुंबांना अन्नधान्य वाटप, पर्यावरण क्षेत्रामध्ये वृक्ष लागवड, ऐतिहासिक गट-कोट किल्ल्यांची साफसफाई, तीर्थक्षेत्रावरील नद्यांची साफसफाई इत्यादी क्षेत्रात श्री थोरात सामाजिक काम करत असून महाराष्ट्र रत्न वीर शिवछत्रपती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

भारत मातेचा पुत्र आज तिच्या कुशीत विसावला

श्री. गणपत दादा पवार माजी सैनिक काळाच्या पडद्याआड



सातारा : जिल्हा हा शूरवीरांचा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो याच जिल्ह्यातील कृष्णा कोयनेच्या प्रीतीसंगमावर वसलेल्या, देशाचे माजी संरक्षण मंत्री स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कराड तालुक्यातील, चारी बाजूंनी डोंगरांनी वेढलेल्या श्री निळेश्वराचे पावन वास्तव्य असलेल्या वडोली निळेश्वर सारख्या छोट्याशा खेड्यात १९३७ साली दादा हरी पवार यांचे सर्वसामान्य कुटुंबात आपला जन्म झाला वयाच्या अठराव्या वर्षी सन १९५५ ज्या काळात की ज्यावेळी लोक मिलिटरी मधे जायलाच काय गणवेशधारी सैनिक लोकांना बघून घाबरायचे अशा काळात भरती होणे ही तर दूरचीच गोष्ट, अशा प्रतिकूल काळात आपण सैन्यात भरती झालात भारत मातेच्या स्वातंत्र्याचा अवघ्या आठ वर्षांचा तो काळ म्हणजे हजारो लाखो भारतीयांच्या बलिदानाने मिळालेले हेच ते स्वातंत्र्य होते ते टिकून टेवण्याकरता संरक्षण दल तटबंदी मजबूत असणे काळाची गरज होती याच काळात युवकांची सैन्यात मोठी भरती केली जातात होती. आपणही देशभक्तीने प्रेरित होऊन कौटुंबिक हलाकीच्या जोरावर देश सेवेचे व्रत हाती घेतले ज्यावेळी सैन्यामध्ये असणाऱ्या शिस्तीच्या दरारने लोकांचा थरकाप उडत असे. लोक त्याकाळी मिलिटरी, सैनिका विषय मनामध्ये आदर युक्त भीती बाळगत, फारच कमी सैनिकांच्या वाट्याला देशाच्या युद्ध भूमीवर सहभागी होण्याची संधी मिळत असे मात १९६२ च्या भारत चीन १९६५ च्या भारत पाकिस्तान आणि १९७५ च्या भारत बांगला या तिन्ही युद्धामध्ये १९ मराठा लाईट इन्फंट्री तुकडीच्या माध्यमातून प्रत्यक्ष युद्धभूमीवर शत्रूशी, शत्रू सैन्याशी मुकाबला करण्याची सुवर्णसंधी मिळाली अर्थात त्याकाळचे युद्ध हे आजच्या आधुनिक यंत्रसामुग्रीने लढण्यासारखे नव्हते हजारो मैला वरून केलेल्या जाणाऱ्या युद्धा प्रमाणे नव्हते तर अवघ्या हाकेच्या अंतरावरील शत्रू सैन्यासमोर तोकड्या साधनांच्या साह्याने जीवाची बाजी लावत असे १९६२ च्याचीन युद्धाचा अपवाद वगळता पाकिस्तान व बांगलादेश युद्धामध्ये आपणासारख्या लाखो जवानांच्या लढायच्या वृत्तीतून त्यागातून कष्टातून काही भारत मातेच्या सुपुत्रांच्या बलिदानातून मिळाले आहे हे प्रत्येक भारतीयाला कदापि विसरून चालणार नाही सैन्यात असतानाच आपण महाराष्ट्राची शान असलेला पारंपारिक कुस्ती क्रीडा प्रकारात आपण फलटणीला विविध पदके मिळवून देऊन कलेची जोपासना केली १९ वर्षाच्या सेवेत शिपाई नाईक हवलदार पदावरून सेनानिवृत्तीनंतर ही २३ वर्षे सह्याद्री सहकारी साखर कारखान्यामध्ये संरक्षण विभागात आपण सेवा केली अर्थातच हे सर्व साध्य झाले ते त्यांचे कुटुंबीयांचे पाठबळ कारण आपण आपल्या तीन मुले व एक मुलीला उच्च शिक्षित केले याचाच परिपाक म्हणून दोन्ही ज्येष्ठ मुले अलिबाग येथे मोठ्या कंपनीत उच्च पदावर कार्यरत होती कनिष्ठ मुलगा ही व्यसनमुक्ती युवक संघाच्या माध्यमातून शेतीवरोबर अध्यात्मिक सामाजिक कार्य करीत आहे प्रत्येक यशस्वी माणसाकडे स्वतःची ओळख असते पण ती मिळवण्यासाठी त्याला करावा लागणार संघर्ष येणाऱ्या प्रसंगाला धैर्याने तोंड देत स्वतःला विश्वास घेऊन झगडावे लागते निवृत्तीच्या ४० वर्षे अधिक कालखंड उलटूनही अंगावरच्या वर्दी नंतर आपल्या विचारत देशाभिमान चिरंतन टिकून होता आपण एक भारत मातेचे लाडके सैनिक म्हणून तीन युद्धामध्ये बजावलेली भूमिका समस्त वडोली निळेश्वर ग्रामस्थ व परिसरातील युवकांच्या करता प्रेरणा स्तोत्र व स्फूर्ती स्थान म्हणून सदैव लक्षात राहील यात शंका नाही ....आपणास शत शत प्रणाम !!!

शिरूर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष मितेश गादियांविरोधातील अविश्वास ठराव बहुमताने मंजूर!

२० मतांनी ठराव पारित; नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सर्वसाधारण सभा संपन्न

पुणे जिल्हा प्रतीनिधी / अविनाश घोगरे



शिरूर : शिरूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष मितेश प्रदीप गादिया यांना पदावरून दूर करण्यासाठी मांडण्यात आलेला अविश्वास ठराव शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत बहुमताने मंजूर करण्यात आला. उपनगराध्यक्षांना पदावरून दूर करण्यासाठी बाजूने २० मते पडल्याने त्यांना उपनगराध्यक्ष पदावरून काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांनी सभेत जाहीर केले. शुक्रवारी सकाळी ११ वाजता शिरूर नगरपरिषदेची विशेष सर्वसाधारण सभा नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांच्या अध्यक्षतेखाली आदरणीय श्री. रसिकभाऊ धारिवाल सभागृहात आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ५५-१अ अन्वये उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्यासंदर्भातील तरतुदीनुसार, नगरपरिषदेच्या सदस्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी ही विशेष सभा बोलावण्यात आली होती.

२६ ऑक्टोबर रोजी दिली होती नोटीस

शिरूर नगरपरिषदेच्या कामकाजाबाबत असमाधान व्यक्त करत नगरपरिषदेच्या नगरसेविका संगीता मेहेंद्र मल्लाव व इतर १८ नगरसेवकांनी उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्याविरोधात अविश्वास ठराव मांडण्यासाठी विशेष सभा लवकरात लवकर आयोजित करावी, अशी मागणी केली होती. यासंदर्भात संबंधित नगरसेवकांनी दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी नगराध्यक्षा यांना सूचना नोटीस दिली होती. या नोटिशीच्या अनुषंगाने अविश्वास ठराव मांडण्याचा निर्णय घेण्यात आला आणि कायद्यातील संबंधित तरतुदीनुसार दि. ३० ऑक्टोबर रोजी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली.

२८ पैकी २७ सदस्यांची उपस्थिती; सहा सदस्यांचा सभात्याग

विशेष सर्वसाधारण सभेच्या सुरुवातीला नगरपरिषदेचा एकूण २८ सदस्यांपैकी २७ सदस्य उपस्थित होते. मात्र, सभेदरम्यान सहा सदस्यांनी सभात्याग केला. यामध्ये उपनगराध्यक्ष मितेश प्रदीप गादिया, स्वप्नाली योगेश जामदार, सुनीता संतोष पोटे, चाफळिया गणेश कोळपकर, रवी ऊर्फ शाम मनोहर ढोबळे आणि अमोल दादासाहेब चव्हाण यांचा समावेश होता.



माजी विद्यार्थ्यांचे विद्यालयाप्रती ऋणानुबंध कायम!

न्यू इंग्लिश स्कूल कवठे येमाईला सन २००० - २००१ च्या बॅचकडून साऊंड सिस्टिम व मिक्सरची सप्रेम भेट

कवठे प्रतिनिधी/ धनंजय साळवे

कवठे यमाई : विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श निर्माण केला आहे. न्यू इंग्लिश स्कूल, कवठे येमाई येथील सन २०००-२००१ च्या माजी विद्यार्थी बॅचच्या वतीने विद्यालयास साऊंड सिस्टिम व मिक्सर हे साहित्य शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सप्रेम भेट देण्यात आले. माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून विद्यालयाप्रती असलेले प्रेम, जिव्हाळा आणि कृतज्ञतेची भावना अधोरेखित झाली.

विद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या गरजा लक्षात घेऊन हे साहित्य भेट देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला. या साहित्याचा उपयोग विद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच विविध कार्यक्रमांसाठी होणार असून, त्यामुळे शालेय उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे.

या वेळी सन २०००-२००१ च्या बॅचच्या वतीने पांडुरंग भोर, भरत रोडे, प्रमोद गायकवाड, गुलाब जाधव, दादाभाऊ जाधव व राकेश बोरा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयाचे प्राचार्य शिवराम मुंजावडे यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. यावेळी विद्यालयातील सेवकवृंद महेंद्र दरवडे, शरद बोंबे, संतोष सोनवणे, सस्काराम दाभाडे, मच्छिंद्रनाथ करंजकर, अनिल बाणखेले, हेमा कड्डे, शिल्पा नेहरे, कामिनी गवळी, सत्यश्री थोरात, सौ. उज्वला पवार, सविता धसाडे, दर्शना राजगुरू, धनश्री तावरे, रंभा गांगुर्डे व भाऊ शिंदे मामा उपस्थित होते.

शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे संस्कारकेंद्र असते. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कारांच्या बळावर यशस्वी वाटचाल करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यालयासाठी योगदान देणे, ही अभिमानास्पद बाब आहे. सन २०००-२००१ च्या बॅचने दिलेल्या या भेटीमुळे माजी विद्यार्थी आणि विद्यालय यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ झाले आहे.

माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे विद्यालयाच्या वतीने कौतुक करण्यात आले. शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यां च्या शैक्षणिक विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेणे, ही इतरांसाठीही प्रेरणादायी बाब ठरत आहे.

लाखणगाव येथे मा. मंत्री श्री. दिलीपराव वळसे पाटील साहेब यांच्या वाढदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

विशेष प्रतिनिधी /कैलास गायकवाड

लाखणगाव : आज शुक्रवार दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे संचलित न्यू इंग्लिश स्कूल, लाखणगाव येथे आंबेगाव तालुक्याचे भाग्यविधाते, जनसामान्यांचे लाडके माननीय आमदार तथा माजी मंत्री श्री. दिलीपराव वळसे पाटील साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त एका विशेष अभिष्टचिंतन सोहळ्याचे व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सार्वजनिक जीवनातील त्यांच्या प्रदीर्घ वाटचालीचा, नेतृत्वाचा आणि कार्याचा गौरव करण्यासाठी तसेच त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे, या सद्भावना सेवेतून हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे औचित्य साधून अंध मुलांसाठी २१००० रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. तसेच हस्ताक्षर स्पर्धा, विद्यार्थीनिर्मित आकाश कंदील प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नेते लहुअण्णा पडवळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ गाडगे, उपाध्यक्ष प्रदीप रोडे, उद्योजक सोमनाथ पोंदे, सदस्य दत्तात्रय गवते, कारभारी दौंड, गुलाब रोडे, मुख्याध्यापक अनिल देसले, सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे व्यवस्थापन कल्पना राजगुरू, छाया वाघुंडे यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल देसले यांनी केले, सोमनाथ पोंदे यांनी मनोगत व्यक्त केले, सूत्रसंचालन प्रविण शिकारे तर आभार रसिका शिंदे यांनी मानले. उपस्थित विद्यार्थी व मान्यवरांना शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ गाडगे यांच्या वतीने केळी व मोसंबी खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



डाउन सिंड्रोम असलेल्या पार्थची जिद्द, तर ७ वर्षीय आदीचा नवा विक्रम! दोन्ही सख्ख्या भावांची १८ किलोमीटर समुद्री भरारी.

पार्थने ६ तास ५७ मिनिटांत, तर आदीने अवघ्या ५ तास ५६ मिनिटांत पूर्ण केले एलिफंटा ते नागाव - पिरवाडी बीचचे आव्हान पूर्ण

तालुका प्रतिनिधी/ विद्दूल ममताबादे

उरण : जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास आणि कठोर मेहनतीच्या जोरावर कोणतेही आव्हान अशक्य नसते, हे उरणमधील पार्थ निशांत पाटील आणि आदी निशांत पाटील या दोन सख्ख्या भावांनी आपल्या असामान्य कामगिरीतून सिद्ध करून दाखवले आहे. एलिफंटा लेणी (घारापुरी) ते नागाव-पिरवाडी बीच (उरण) असे सुमारे १८ किलोमीटरचे समुद्री अंतर पोहून पूर्ण करत या दोन्ही भावांनी क्रीडा क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, डाउन सिंड्रोम असलेल्या पार्थने हे आव्हान यशस्वीरीत्या पूर्ण करून प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले, तर अवघ्या सात वर्षांच्या आदीने हा समुद्री मार्ग पूर्ण करणारा सर्वात लहान जलतरणपटू ठरण्याचा मान मिळवला आहे.

पार्थ निशांत पाटील हा १३ वर्षांचा असून तो सीबर्ड स्पेशल स्कूल, उरण येथे शिक्षण घेत आहे. तर त्याचा लहान भाऊ आदी निशांत पाटील हा अवघ्या ७ वर्षांचा असून सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूल, उरण येथे इयत्ता तिसरीमध्ये शिक्षण घेत आहे. दोघांनाही लहानपणापासूनच पोहण्याची आवड निर्माण झाली. उरण बेलील स्विमिंग पूलमध्ये त्यांनी पोहण्याचा सराव सुरू केला. नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे त्यांची पोहण्यातील आवड अधिक दृढ होत गेली.

शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे २:३० वाजता दोन्ही भावांनी घारापुरी (एलिफंटा लेणी) येथून समुद्रात पोहण्यास सुरुवात केली. सुमारे १८ किलोमीटरचे हे आव्हानात्मक समुद्री अंतर पार्थने ६ तास ५७ मिनिटांत, तर आदीने अवघ्या ५ तास ५६ मिनिटांत पूर्ण करून नागाव-पिरवाडी बीच येथे यशस्वीरीत्या लक्ष्य गाठले.

या संपूर्ण मोहिमेत अवघ्या सात वर्षांच्या आदी निशांत पाटील याची कामगिरी विशेष लक्षवेधी ठरली. एवढ्या कमी वयात १८ किलोमीटरचा आव्हानात्मक समुद्री मार्ग पूर्ण करणे ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. आदीने केवळ ५ तास ५६ मिनिटांत हे अंतर पार करत आपल्या जलतरण कौशल्याची, धाडसाची आणि प्रचंड आत्मविश्वासाची चुणूक दाखवून दिली. या कामगिरीसह एलिफंटा लेणी ते नागाव-पिरवाडी बीच हा समुद्री मार्ग पूर्ण करणारा सर्वात लहान जलतरणपटू म्हणून आदीने विशेष ओळख निर्माण केली आहे. मोठ्या भावासोबत समुद्रातील हे आव्हान यशस्वीरीत्या पूर्ण करत आदीने उरणच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला आहे.

दुसरीकडे, डाउन सिंड्रोम असलेल्या १३ वर्षीय पार्थची कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरली आहे. पार्थने तब्बल ६ तास ५७ मिनिटे समुद्रात सातत्याने पोहत १८ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले. विशेष गरजा असलेल्या मुलांमध्येही अफाट क्षमता असते आणि योग्य प्रशिक्षण, संधी, प्रोत्साहन व कुटुंबाचा भक्कम आधार मिळाल्यास तेही उल्लेखनीय यश संपादन करू शकतात, हा सकारात्मक संदेश पार्थने आपल्या कामगिरीतून समाजासमोर ठेवला आहे. डाउन सिंड्रोम असलेल्या विद्यार्थ्याने हा समुद्री मार्ग पूर्ण करण्याची ही महाराष्ट्रातील पहिली कामगिरी असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या सुमारे चार वर्षांपासून दोन्ही भावंडे पोहण्याच्या क्षेत्रात मेहनत घेत आहेत. उरण म्युनिसिपल कौन्सिल आणि महाराष्ट्र राज्य अर्चरी असोसिएशन यांच्या जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये त्यांनी सहभाग घेतला असून विविध स्पर्धांमध्ये पदकेही मिळवली आहेत. या अनुभवाच्या जोरावर त्यांनी समुद्रातील लांब पल्ल्याचे पोहण्याचे आव्हान स्वीकारण्याची तयारी केली. या आव्हानासाठी त्यांना सी-स्विमिंग कोच तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू संतोष पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच स्विमिंग पूलमध्ये कोच विजय बेहेरा यांनी त्यांना पोहण्याचे प्रशिक्षण दिले. दोन्ही प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण सराव करत त्यांनी १८ किलोमीटरच्या समुद्री पोहण्याचे आव्हान पूर्ण केले. या मोहिमेत निरीक्षक म्हणून सुनील मयेकर आणि निल लव्हे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच विंडसर्फिंगमधील गोल्ड मेडलिस्ट राज पाटील आणि साई पाटील यांचेही सहकार्य लाभले. या यशामागे पालकांचेही मोठे योगदान आहे. वडील निशांत पाटील हे कॉन्ट्रॅक्टर असून इलेक्ट्रिकल मेंटेनन्सचा व्यवसाय करतात. आई संपदा निशांत पाटील या मुलांच्या शिक्षणासह त्यांच्या पोहण्याच्या प्रशिक्षणाशी आणि सर्वांगीण विकासाशी सातत्याने प्रयत्नशील असतात. तसेच पतीच्या व्यवसायातही त्या सहकार्य करतात. मुलांच्या स्वप्नांना बळ देत त्यांनी प्रत्येक टप्प्यावर दोघांनाही प्रोत्साहन दिले.

पार्थ आणि आदी या दोघांच्या कामगिरीतून वेगवेगळे प्रेरणादायी संदेश समाजासमोर आले आहेत. पार्थने विशेष मुलांमधील क्षमता आणि जिद्दीची ताकद दाखवून दिली, तर आदीने लहान वयातही मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्याची क्षमता सिद्ध केली. एकाच कुटुंबातील या दोन भावांनी एकाच दिवशी १८ किलोमीटरचे समुद्री आव्हान पूर्ण करणे ही उरणसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

भविष्यात जलतरण क्षेत्रात आणखी प्रगती करून मोठ्या स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी व्हायचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करायचे, असे स्वप्न या दोन्ही भावंडांनी उराशी बाळगले आहे. पार्थ आणि आदी यांच्या या असामान्य कामगिरीमुळे उरणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून त्यांच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. जिद्द, मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि कुटुंबाच्या भक्कम पाठिंब्याच्या जोरावर कोणतीही मर्यादा ओलांडता येते, हा प्रेरणादायी संदेश या दोन्ही भावांनी आपल्या कामगिरीतून दिला आहे.

नागपूर जिल्ह्यातील १८ शहरांत उभारणार सीसीटीव्ही यंत्रणा



१३६ कोटी २९ लाखांच्या प्रकल्पाला गृह विभागाची प्रशासकीय मान्यता;

काटोल, सावनेर, वडोदाचाही समावेश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

नागपूर/ दिलीप येवले

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासह गुन्हेगारी प्रवृत्तीना आळा घालण्यासाठी जिल्ह्यातील १८ शहरांमध्ये आधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाच्या १३६ कोटी २९ लाख ९२ हजार ४३३ रुपये खर्चाच्या विस्तृत प्रकल्प अहवालाला राज्याच्या गृह विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय ३० ऑक्टोबर रोजी जारी करण्यात आला.

नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील शहरांमध्ये सीसीटीव्ही निगराणी यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव यापूर्वी तयार करण्यात आला होता. सुरुवातीला या प्रकल्पात १५ शहरांचा समावेश होता. मात्र, १३ ऑक्टोबर २०२६ रोजी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय शक्तीप्रदत्त समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार काटोल, वडोदा आणि सावनेर या आणखी तीन शहरांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे आता एकूण १८ शहरांमध्ये ही यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

याप्रकल्पात उमरेड, बुटीबोरी, कन्हान-पिपरी, रामटेक, नरखेड, कळमेश्वर, खापा, मोवाड, मौदा, भिवापूर, पारशिवनी, कुही, कांद्री, कोंढाळी, मोहपा, काटोल, वडोदा आणि सावनेर या शहरांचा समावेश आहे.

या सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणेमुळे संबंधित शहरांमधील कायदा व सुव्यवस्था राखण्यास, गुन्हेगारी प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवण्यास तसेच गुन्ह्यांचा तपास अधिक प्रभावीपणे करण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित निगराणी यंत्रणा उभारण्याचा हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे.नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनी १९ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ शहरांचा समावेश असलेला एकत्रित सुधारित प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्यानंतर गृह विभागाने या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्पासाठी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार मानले.

नागपूर ग्रामीणमधील १८ शहरांतील नागरिकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शहरांच्या सुरक्षेला अधिक बळकटी देण्याचा राज्य शासनाचा हा निर्णय आहे. यामुळे नागपूर ग्रामीण जिल्ह्याची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होईल.

चंद्रशेखर बावनकुळे
महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत सुवर्ण पदक व राष्ट्रीय स्तरावर निवड हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालयाचा विद्यार्थी पियुष गोमासे याला सुवर्ण पदक



नागपूर दिलीप येवले:-

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत सुवर्ण पदक व राष्ट्रीय स्तरावर निवड हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालयाचा विद्यार्थी पियुष गोमासे दिनांक १८, १९, २० ऑक्टोबर २०२६ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ बॉक्सिंग (पुरुष) वर्गात आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये हजरत बाबा ताजुद्दीन कला वाणिज्य महाविद्यालय ताजाबाद शरीफ, उमरेड रोड नागपूर या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात शादाब एज्युकेशन सोसायटी नागपूर चे अध्यक्ष अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, संस्थेचे सचिव मोहम्मद शादाब अब्दुल सलीम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शकील सत्तार, डॉ. विरेंद्र आदमने, डॉ. सुभाष धोटे, डॉ. सुरेश काळे, डॉ. मिनाक्षी इंगळे, डॉ. विनोद शेंडे, डॉ. नामदेव मोरे, डॉ. समीर बडगुजर, प्रा.अर्पित पुंज, प्रा. राहुल डेंगे, प्रा. अंकीत मेटांगे, प्रा. किरण हटवार, प्रा. प्रांजली हाडगे, प्रा. प्रा.तनवीर खान या सर्वांनी सत्कार व अभिनंदन केले.

बॉक्सिंग स्पर्धेचे राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करणार आहे. राष्ट्रिय बॉक्सिंग स्पर्धा नोएडा, नवी दिल्ली येथे होणार आहे. या विद्यार्थ्याला सुवर्ण पदक व राष्ट्रिय स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे नेतृत्व करणारी संधी मिळाल्याबद्दल विद्यापीठाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यासोबतच हजरत बाबा ताजुद्दीन कला वाणिज्य महाविद्यालय ताजाबाद शरीफ, उमरेड रोड नागपूर या विद्यार्थ्याचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात शादाब एज्युकेशन सोसायटी नागपूर चे अध्यक्ष अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, संस्थेचे सचिव मोहम्मद शादाब अब्दुल सलीम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शकील सत्तार, डॉ. विरेंद्र आदमने, डॉ. सुभाष धोटे, डॉ. सुरेश काळे, डॉ. मिनाक्षी इंगळे, डॉ. विनोद शेंडे, डॉ. नामदेव मोरे, डॉ. समीर बडगुजर, प्रा.अर्पित पुंज, प्रा. राहुल डेंगे, प्रा. अंकीत मेटांगे, प्रा. किरण हटवार, प्रा. प्रांजली हाडगे, प्रा. प्रा.तनवीर खान या सर्वांनी सत्कार व अभिनंदन केले.

विधान परिषद निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या विजयाचा कंधारमध्ये काँग्रेस चा जल्लोष!

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण; फटाके फोडून, पेढे वाटून संजय भोसीकर व काँग्रेस कार्यकर्त्यांनी साजरा केला आनंदोत्सव



कंधार । संतोष कांबळे

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीने पाच पैकी तीन जागांवर विजय मिळविल्याच्या पार्श्वभूमीवर कंधार येथे कंधार तालुका अध्यक्ष संजय भोसीकर व काँग्रेस कार्यकर्त्या च्या वतीने जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर फटाके फोडून आणि पेढे वाटून काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंद व्यक्त केला.

विधान परिषद निवडणुकीत मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून डॉ. प्रतापसिंह पाटील, नागपूर विधान परिषद मतदारसंघातून अभिजीत वंजारी आणि पुणे विधान परिषद मतदारसंघातून श्रीमती हर्षदा जाधव देशमुख यांनी विजय मिळविल्याबद्दल उपस्थितांनी आनंद व्यक्त केला.

या विजयामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, कंधारमध्ये काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत विजयाचा आनंद साजरा केला. यावेळी विविध राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची उपस्थिती

या आनंदोत्सवात कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर, शहराध्यक्ष सय्यद सलीम सय्यद रहीम, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस डॉ. राजेश गुट्टे, माजी नगरसेवक डॉ. दीपक बडवणे, जिल्हा सरचिटणीस बसवंतेश्वर मंगनाळे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शाम पाटील कपाळे, जिल्हा सहसचिव गंगेशसिंह ठाकूर, नगरसेवक सचिन बसवते, सेवादलाचे शहराध्यक्ष के. पी. नवघरे, डॉ. श्रीकांत पांडागळे, तालुका सचिव सुरेश कल्लाळीकर, माजी नगरसेवक मगदुमकुरेशी, ?.ड. कलीम अन्सारी, युवक काँग्रेसचे जिल्हा महासचिव शिवम पाटील कुरुळकर, मोहनराव कांबळे, संदीप कल्याणकरपुरे, सोमेश्वर देवपुजे, शेख आसिफ, शेख रब्बानी आदींसह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. महाविकास आघाडीच्या विजयाचा आनंदोत्सव साजरा करत कंधारमधील काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकजुटीचे दर्शन घडविले.

संविधान दिनानिमित्त राज्यस्तरीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन

भंडारा: भारतीय संविधान दिनाच्या ७७ व्या वर्षानिमित्त ध्येयनिष्ठ अधिकारी युग, महाराष्ट्र यांच्या वतीने राज्यस्तरीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या इमेरजवारांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे, राज्यशास्त्राचे ज्ञान वाढविणे तसेच चालू घडामोडींचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

या स्पर्धेमध्ये भारतीय राज्यघटना, राज्यशास्त्र आणि चालू घडामोडी या विषयांवर आधारित बहुपर्यायी प्रश्नविचारले जाणार आहेत. प्रश्नपत्रिकेत एकूण ६० प्रश्न असून प्रत्येक प्रश्नाला दोन गुण असतील. परीक्षा २४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ ते १२.३० या वेळेत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. स्पर्धेचा निकाल २६ नोव्हेंबर २०२६ रोजी जाहीर करण्यात येईल. सहभागी सर्व स्पर्धकांना ऑनलाइन प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास २,००१ रुपये, द्वितीय क्रमांकास १,५०१ रुपये आणि तृतीय क्रमांकास १,००१ रुपये रोख पारितोषिकासह 'शोध सुबत्ता' हे पुस्तक देण्यात येणार आहे. तसेच सहा उत्तेजनार्थ विजेत्यांना प्रत्येकी २०१ रुपये देण्यात येतील. स्पर्धेची प्रवेश फी ५१ रुपये असून नोंदणीची अंतिम तारीख २२ नोव्हेंबर २०२६ आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी परवेश मेश्राम (७६२०९९२४६२), दिलीप येवले (९८९०५६१२४१), अनिल भगवान चव्हाण (८८०६३७९९५९) किंवा दिनेश मंडपे (८१९९५५८७४५) यांच्याशी व्हॉट्स?प संदेशाद्वारे संपर्क साधावा. ऑनलाइन शुल्क भरल्यानंतर त्याचा स्क्रीनशॉट पाठवून नोंदणी पूर्ण करावी. अधिक माहितीसाठी केवळ व्हॉट्स?प संदेशाद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

नागठाणयात शिवकालीन इतिहासाचा जागर!

किल्ले बांधणी स्पर्धा २०२६ चे आयोजन;


सातारा/ गणेश दळवी:

विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके

नागठाणे : छत्रपती शिवाजी महाराजांचा देदीप्यमान इतिहास आणि महाराष्ट्राच्या गडकिल्ल्यांचा वैभवशाली वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अभय 'मैत्रल्हू कला व क्रीडा गणेशोत्सव मंडळ, नागठाणे यांच्या वतीने दिवाळीनिमित्त 'किल्ले बांधणी स्पर्धा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे.

'यंदाचा किल्ला इतिहास दाखवण्यासाठी नाही, तर इतिहास वाचवण्यासाठी!' या प्रभावी संदेशातून ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे आवाहन मंडळाने केले आहे.

या स्पर्धेत ५ ते २० वर्षे वयोगटातील मुला-मुलींना सहभागी होता येणार असून प्रवेश पूर्णपणे मोफत ठेवण्यात आला आहे.



स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास २ हजार १ रुपये, द्वितीय क्रमांकास १ हजार ५०१ रुपये, तृतीय क्रमांकास १ हजार १ रुपये, तर चतुर्थ क्रमांकास ५०१ रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

किल्ल्यांची निर्मिती करताना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर, कल्पकता, सर्जनशीलता आणि ऐतिहासिक संदर्भांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून बालकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाविषयी अभिमान, गड-किल्ल्यांच्या संवर्धनाची जाणीव आणि कलात्मक कौशल्य विकसित होण्यास मदत होणार आहे.

शिवकालीन इतिहासाची ओळख केवळ पुस्तकांपुरती मर्यादित न राहता ती कृतीतून जपली जावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत नागठाणे परिसरातील अधिकाधिक बालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे

डॉ. नितीन राऊत आंतरराष्ट्रीय व्याख्यानमाला आज

नागपूर /दिलीप येवले

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भगवान गौतम बुद्धांच्या शिकवणीवरील डॉ. नितीन राऊत आंतरराष्ट्रीय व्याख्यानमाला शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली आहे. रवींद्रनाथ टागोर मार्ग वरील महाराज बाग चौक स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात ही व्याख्यानमाला होणार आहे. व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर भूषविणार असून व्याख्याते म्हणून श्रीलंका येथील डॉ. कलिंगा तुडोर सिल्व्हा आणि राजस्थान जोधपूर येथील जय नरैन व्यास विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. श्याम लाल हे उपस्थित राहणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे व कुलसचिव डॉ. विजय खंडाळ यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

आयुष्मान आरोग्य मंदिरांतून आता गावोगावी आरोग्यसेवा!

मुंबई : राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना घराजवळच दर्जेदार, सर्वसमावेशक आणि सातत्यपूर्ण प्राथमिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने आयुष्मान आरोग्य मंदिरांच्या कामकाजासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार उपकेंद्र स्तरावरील आयुष्मान आरोग्य मंदिरांमार्फत नियमित बाह्यरुग्ण सेवा, गावभेटी, गृहभेटी, टेलि मेडिसिन, विविध आजारांची तपासणी आणि आवश्यक प्राथमिक उपचार देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामुळे ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक लोकाभिमुख आणि परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.

केंद्र शासनाच्या सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा संकल्पनेनुसार आरोग्य उपकेंद्रांचे आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. या केंद्रांमधून नागरिकांना केवळ उपचारच नव्हे, तर प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, आजारांचे लवकर निदान, आरोग्य संवर्धन आणि आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यावर शासनाने भर दिला आहे.

निश्चित वेळापत्रकानुसार आरोग्यसेवा

नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार सोमवार ते शुक्रवार सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या वेळेत आयुष्मान आरोग्य मंदिरात बाह्यरुग्ण सेवा देण्यात येणार आहे. याकालावधीत रुग्णांची तपासणी, आवश्यक औषधोपचार आणि रक्तदाबासह इतर प्राथमिक तपासण्या केल्या जातील. दुपारी २ ते ४ या वेळेत समुदाय आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या नियोजनानुसार गावभेटी व समुदायस्तरीय आरोग्यसेवा राबविण्यात येतील. सायंकाळी ४ ते ५ या वेळेत गृहभेटी, तर ५ ते ५.३० या वेळेत दिवसभरातील कामकाजाच्या नोंदी आणि संबंधित पोर्टलवरील माहिती अद्ययावत केली जाणार आहे.

शनिवारी सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या वेळेत बाह्यरुग्ण सेवा तसेच उपकेंद्र किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर सभा, ई-संजीवनी आणि टेलिमेडिसिन सेवांचे नियोजन करण्यात येणार आहे.

प्रत्येक गावात आरोग्यसेवेचा पोहोच

ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवेसाठी दूरवर जावे लागू नये, वासाठी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी दरोज किमान एका गावाला भेट देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुपारी २ ते ४ या वेळेत अंगणवाडी केंद्र, प्राथमिक शाळा किंवा ग्रामपंचायत कार्यालयातील उपलब्ध जागेत बाह्यरुग्ण सेवा आयोजित केली जाणार आहे. गावभेटीचे दिवस निश्चित करून त्यामध्ये बदल होणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. स्थानिक आशा व अंगणवाडी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून नागरिकांना या सेवांची पूर्वकल्पना देण्यात येणार आहे.



आरोग्यसेवेचे वेळापत्रक निश्चित
बाह्यरुग्ण तपासणीसह घरभेटी, टेलिमेडिसिन आणि १४ प्रकारच्या प्रयोगशाळा तपासण्यांवर भर

जागतिक फार्मासिस्ट दिन व राष्ट्रीय फार्मसी सप्ताह



२०२६ निमित्त सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन

कोरडी/ दिलीप येवले

जागतिक फार्मासिस्ट दिन आणि राष्ट्रीय फार्मसी सप्ताह २०२६ च्या निमित्ताने सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसी, देवी रोड, कोराडी, नागपूर येथे 'स्वस्थ भारत : प्रतिजैविक प्रतिरोधाचा मुकाबला' (Swastha Bharat: Combating Antimicrobial Resistance) या संकल्पनेवर आधारित विविध शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये औषधांविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रतिजैविकांचा योग्य वापर व प्रतिजैविक प्रतिरोधाचे दुष्परिणाम यांविषयी समाजात जनजागृती करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि व्यावसायिक कौशल्यांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एन. मलिये यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नोडल अधिकारी डॉ. एन. व्ही. मदन यांच्या समन्वयातून या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत प्रश्नमंजुषा (क्वॅज), माहितीपत्रक (ब्रॅट्), रील (ाार), स्किट्स (एम्ड्ददह) स्पर्धा, पोस्टर सादरीकरण (ड्डी ड्डीहूँ्ददह) आणि पथनाट्य (नुक्कड नाटक) अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित कार्यक्रमप्रमुखांनी विशेष परिश्रम घेतले.

स्पर्धांचे योग्य नियोजन, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आणि कार्यक्रमाचे प्रभावी व्यवस्थापन यांवर विशेष भर देण्यात आला.

या उपक्रमांतर्गत आयोजित प्रश्नमंजुषा, घोषवाक्य, माहितीपत्रक निर्मिती, रील निर्मिती, पोस्टर निर्मिती आणि पथनाट्य अशा विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धांमधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एन. मलिये आणि नोडल ऑफिसर डॉ. एन. व्ही. मदन यांच्या उपस्थितीत विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रतिजैविकांचा अनावश्यक वापर, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय प्रतिजैविके घेण्याचे धोके, औषधांचा निर्धारित कालावधी पूर्ण करण्याचे महत्त्व आणि प्रतिजैविक प्रतिरोध रोखण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना यांविषयी प्रभावीपणे जनजागृती केली. विविध सर्जनशील माध्यमांचा वापर करून विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

महाविद्यालयाच्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आरोग्यविषयक जाणीव, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवादकौशल्य आणि फार्मासिस्ट म्हणून असलेल्या जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली. प्रतिजैविकांचा विवेकपूर्ण वापर आणि प्रतिजैविक प्रतिरोधाविषयी जनजागृती ही निरोगी भारताच्या निर्मितीसाठी महत्त्वाची पावले आहेत, हा संदेश या उपक्रमांतून देण्यात आला.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, नोडल अधिकारी, संबंधित कार्यक्रमप्रमुख डॉ विक. पी. रोडे, डॉ एम. एस. साहू, प्रा. एन. टी. हिंगवे, प्रा. ए. एस. मामीडवार, प्रा पी. आर. कुथे, प्रा. एस. एम. रोंडे, प्रा. जे. डी. वालदे, प्रा. ए. आर. थोटे, प्रा. प्रा. आर. आर. ताले, प्रा. एच. एल. हिरवाणी, प्रा. पी. आर. रजाक, प्रा. डी. पी. बानखेडे, डॉ पी. सी. माटे, डॉ आर ए. साहू, प्रा. आर आर. मिश्रा आदींनी, प्राध्यापकवर्ग आणि सहभागी विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

निवासी 'नझुल' जमिनींसाठी 'विशेष अभय योजने'ला मुदतवाढ

नागपूर आणि अमरावती विभागातील जमीनाधारकांना दिलासा; फडणवीस सरकारचा निर्णय

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जारी केले निर्देश

फ्री-होल्ड, थकीत भाडे व शर्तभंग नियमितीकरण होणार

नागपूर/ दिलीप येवले

नागपूर आणि अमरावती या दोन्ही विभागांतील निवासी नझुल जमिनीसंदर्भात राबविण्यात येत असलेल्या 'विशेष अभय योजना २०२४-२५' ला दि. १ ऑगस्ट २०२६ ते दि. ३१ जुलै २०२७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी आणि विविध कारणांमुळे ज्या भाडेपट्टेदारांना आतापर्यंत या अभय योजनेचा लाभ घेता आला नव्हता. याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर याबाबत आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून २०२४ मध्ये नझुल जमिनींसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. आता लोकांना पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे.

अभय योजनेतील प्रमुख तरतुदी आणि फायदे

२ टक्के अधिमूल्यावर जमीन 'फ्री-होल्ड'

निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे भाडेतत्त्वावर दिलेल्या नझुल जमिनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्यासाठी प्रचलित वार्षिक दरसूचीतील (रेडी रेकनर) बाजारमूल्याच्या अवघ्या २ टक्के एवढे अधिमूल्य आकारले जाईल.

☐ थकीत भाडच्यावर ०.०२ ₹ सवलतीचा दर

अभय योजनेच्या कालावधीत थकीत भाडेपट्ट्याची रक्कम ०.०२ ₹ या सवलतीच्या दराने आकारली जाईल. मात्र, मुदत संपण्यापूर्वी (३१ जुलै २०२७) थकीत भू-भाडे न भरल्यास त्यानंतर थकीत रक्कमेवर वार्षिक १० टक्के दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल.

☐ शर्तभंग नियमितीकरणासाठी १३ अनर्जित रक्कम नझुल जमिनीच्या बाबतीत झालेल्या शर्तभंग नियमितीकरणाच्या प्रकरणांमध्ये, ज्या वर्षी शेवटचा शर्तभंग झाला असेल त्या वर्षाच्या वार्षिक दरसूचीनुसार बाजारमूल्याच्या १३ दराने अनर्जित रक्कम आकारून शर्तभंग नियमित केला जाईल.

☐ योजनेची मुदत व व्याप्ती

ही सुधारित योजना दि. १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०२७ या एका वर्षाच्या कालावधीसाठीच लागू असेल. विशेष अभय योजना संपल्यानंतर म्हणजेच १ ऑगस्ट २०२७ पासून पूर्वीचेच महसूल नियम लागू होतील.



११ जिल्ह्यांतील नागरिकांना लाभ

या निर्णयाचा फायदा विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आणि वाशीम या ११ जिल्ह्यांमधील निवासी नझुल जमिनींच्या हजारो धारकांना होणार आहे.

राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारी 'युनिटी मॅरेथॉन रन'

कोराडी/ दिलीप येवले

कोराडी : देशाचे पहिले गृहमंत्री, उप पंतप्रधान, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त कोराडी पोलीसांच्या वतीने 'युनिटी रन मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.०० वाजता तायवाडे कॉलेज रोड ते महादुला टी पॉईंट पर्यंत करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने कोराडी पोलीसव्दारा 'युनिटी मॅरेथॉन रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांच्या या स्पर्धेतील सहभागातून राष्ट्रीय एकतेचा संदेश देणे हा यामागील उद्देश असून, मोठ्या संख्येने नागरिकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा, तसेच राष्ट्रीय एकतेच्या कार्यात सहभागी व्हावे राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने आयोजित या 'युनिटी मॅरेथॉन'मध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. धावण्याच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देतानाच राष्ट्रीय एकता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना कायम दृढ करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार

देऊरवाडा येथे आरोग्य विभागाची मास सर्वे मोहीम यशस्वी

ताप रुग्णांचा शोध, डासांच्या उत्पत्तीस्थळांची तपासणी; जलजन्य व कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती



देऊरवाडा : प्राथमिक आरोग्य केंद्र, जळगाव अंतर्गत उपकेंद्र देऊरवाडा येथे शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी आरोग्य विभागाच्या वतीने मास सर्वे (रॅपिड एल्नेड) मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे गावातील नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यासोबतच डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया तसेच जलजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी व्यापक जनजागृती करण्यात आली. या मोहिमेदरम्यान आरोग्य पथकाने गावातील घरोघरी भेट देऊन तापाच्या रुग्णांचा शोध घेतला. संशयित रुग्णांची आरडीके ('ज अँटिइंग्रेम स्ट्रू) द्वारे तातडीने रक्त तपासणी करण्यात आली. तसेच घरातील पाण्याच्या टाक्या, ड्रम व इतर पाणी साठवणुकीच्या भांड्यांची तपासणी करून डासांच्या उत्पत्तीची संभाव्य ठिकाणे शोधण्यात आली.

डासांची पैदास रोखण्यासाठी साचलेल्या पाण्यात टेमिफॉस या अळीनाशक औषधाचा वापर करण्यात आला. तसेच विहिरी व इतर योग्य पाणीसाठ्यांमध्ये गप्पी मासे सोडण्याचे महत्त्व पटवून देत डासांच्या अळ्यांवर जैविक नियंत्रण ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय सांडपाण्याचे नाले, घरासमोरील परिसर स्वच्छ व कोरडा ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी श्री. अविनाश चव्हाण यांनी ग्रामस्थांना दूषित पाण्यामुळे होणाऱ्या अतिसार, कावीळ, टायफॉईड व कॉलरा यांसारख्या आजारांची माहिती दिली. पिण्याचे पाणी उकळून किंवा शुद्ध करून वापरणे, पाणी साठविण्याची भांडी स्वच्छ व झाकून ठेवणे, जेवणापूर्वी आणि शौचालयाचा वापर केल्यानंतर साबणाने हात धुणे, तसेच परिसरात पाणी साचू न देणे या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्त्व त्यांनी विशद केले.

'शुद्ध पाणी, स्वच्छता आणि निरोगी जीवन' हा संदेश देत आरोग्य विभागाने नागरिकांना वैयक्तिक स्वच्छतेसोबतच सार्वजनिक स्वच्छतेबाबतही जागरूक राहण्याचे आवाहन केले.

या मोहिमेला डॉ. भगत, राजेश जाधव, अविनाश चव्हाण, जगदीश चव्हाण यांच्यासह सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका आणि आशा स्वयंसेविकांची उपस्थिती होती.

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे 'संशोधन पद्धती' विषयावर एक दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

नागपूर/ दिलीप येवले

मोहपा एज्युकेशन सोसायटी, मोहपा द्वारे संचालित बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथील स्नातकोत्तर मराठी, समाजशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (ईक) च्या संयुक्त विद्यमाने उद्या, शनिवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी 'संशोधन पद्धती' (रिसर्च मेथडॉलॉजी) या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा महाविद्यालयात सकाळी ८.०० ते १२.३० या वेळेत ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. आजच्या शैक्षणिक जगतात संशोधनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. ज्ञाननिर्मिती, तिचे विश्लेषण आणि प्रसार करण्याची पद्धतशीर प्रक्रिया म्हणजे संशोधन होय. याच पार्श्वभूमीवर प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना संशोधन प्रक्रियेची सखोल माहिती व्हावी आणि त्यांच्यातील संशोधन कौशल्याचा विकास व्हावा, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून नवीन महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ सुनीलकुमार नवीन उपस्थित राहणार असून तज्ञ मार्गदर्शक शारीरिक शिक्षण महाविद्यालय जामठा, नागपूर येथील प्राचार्य मा. डॉ. तपन दत्ता हे मार्गदर्शन करणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद मोहपा शिक्षण संस्थेचे संचालक, प्रमोद वानखेडे भूषविणार आहे.

या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्यांना बौद्धिक निर्मितीचे संरक्षण, संशोधन प्रक्रियेचे व्यावहारिक ज्ञान आणि समकालीन प्रवाहांची ओळख करून दिली जाणार आहे.

या राज्यस्तरीय कार्यशाळेचा जास्तीत जास्त प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, महाविद्यालयाचे असे आवाहन, प्राचार्य डॉ. अलका थोडगे, डॉ. विनोद भालेराव, डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केले आहे.

श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विज्ञान-चित्रकथा (Scitoon) स्पर्धेचे आयोजन

जागतिक फार्मासिस्ट दिन आणि राष्ट्रीय फार्मसी सप्ताहाच्या राज्यस्तरीय सोहळा २०२६ अंतर्गत विद्यार्थ्यांनी दाखवली कलात्मक प्रतिभा

कामठी /दिलीप येवले

श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी येथे जागतिक फार्मासिस्ट दिन आणि राष्ट्रीय फार्मसी सप्ताहाच्या राज्यस्तरीय सोहळा २०२६ अंतर्गत २२ ऑक्टोबर रोजी विज्ञान-चित्रकथा (एम्प्युदह एदरज्रूम्दह) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (इण्ड), नवी दिल्ली यांच्या प्रायोजकत्वाखाली आयोजित या स्पर्धेत एकूण ५५ संघांनी सहभाग नोंदवला असून, सुमारे १०० विद्यार्थ्यांनी आपल्या कलात्मक आणि वैज्ञानिक कल्पकतेचे प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला



प्रोत्साहन देणे आणि आरोग्यविषयक जनजागृती वाढवणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

स्पर्धेचा विषय 'निरोगी भारत : रोगाणुरोधी प्रतिरोधाविरुद्ध लढा' हाहोता. विद्यार्थ्यांनी कार्टून आणि चित्रांच्या माध्यमातून प्रतिजैविक औषधांचा योग्य वापर, औषध सुरक्षा, लसीकरण, संसर्गप्रतिबंध आणि सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणामध्ये फार्मासिस्टची भूमिका प्रभावीपणे मांडली.

स्पर्धेत मौलिकता, वैज्ञानिक अचूकता, कल्पकता आणि सादरीकरण या निकषांच्या आधारे मूल्यांकन करण्यात आले. स्पर्धेच्या परीक्षक मंडळामध्ये डॉ. नेहा राऊत, डॉ. मयूर काळे आणि डॉ. संदीप राहंगडाले यांचा समावेश होता. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मूल्यांकन करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघांची निवड केली.

स्पर्धेतील विजेते व उपविजेते

डप्रथम पारितोषिक (विजेते):- कु. सेजल कायते- कु. रक्षा कोकोडेद्वितीय पारितोषिक (उपविजेते): कु. अश्वा खान - कु. गौरी सालबर्डीमहाविद्यालयाती निवड प्रक्रियेनंतर निवडलेले दोन उत्कृष्ट संघ राज्यस्तरीय स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या स्पर्धेसाठी निवड झालेल्या संघांना नागपूर येथील सिव्हिल लाइन्स परिसरातील डॉ. बसंतराव देशपांडे मेमोरियल हॉल येथे फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या अध्यक्षांच्या हस्ते सन्मानित करण्यायी व्यवस्था करण्यात आली होती.

स्थानिक महिला उद्योजिकांसाठी 'अंकुर दीपावली बाजार'चे आयोजन

अमृत संस्था आणि महिला कला निकेतनचा संयुक्त उपक्रम

नागपूर, दिलीप वेवले:

स्थानिक महिला उद्योजिकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तसेच 'व्होकल फॉर लोकल' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला बळ देण्यासाठी 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) आणि 'महिला कला निकेतन' यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या (३१ ऑक्टोबर) विशेष 'अंकुर दीपावली बाजार व अमृत पेठ' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.


स्थानिक महिला उद्योजिकांनी तयार केलेल्या विविध दिवाळी उपयुक्त व कलात्मक वस्तूंचे स्टॉल्स असलेले हे प्रदर्शन 'महिला कला निकेतन', ५८५, गिरीपेठ, नागपूर येथे भरवण्यात येत असून प्रवेश निशुल्क आहे. प्रदर्शनाची वेळ दुपारी ४ ते रात्री ९ टेंभण्यात आली आहे.

सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन मिळावे आणि महिलांच्या स्वावलंबनाला हातभार लागावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे 'अमृत'चे नागपूर जिल्हा व्यवस्थापक आदित्य कुलकर्णी यांनी सांगितले.

या प्रदर्शनात सजावटीच्या वस्तू आकाश कंदील, आकर्षक पणत्या, बोरोसिलीकेट काचेचे दिवे, तयार रांगोळ्या, एमडीएफ, क्रोशा व भ्रॅक्रमच्या वस्तू येथे विक्रीसाठी उपलब्ध असून विविध प्रकारची वस्त्र प्रावरणे तसेच घरगुती व आरोग्यदायी खाद्यपदार्थांच्या दालनात सुकामेव्याचे लाडू, आयुर्वेदिक उत्पादने, घरगुती चॉकलेट, उकडीचे मोदक, कटलेट तसेच धान्यांची मिश्र पिठे येथे विक्रीस असणार आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नऊ परीक्षांसंदर्भात चौकशी - तुकाराम मुंढे

व्यक्ती, परीक्षार्थी व विद्यार्थ्यांना १६ नोव्हेंबरपर्यंत निवेदन सादर करण्याचे आवाहन



मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमधील प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका फुटण्याच्या कथित प्रकरणांची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग गठित करण्यात आला आहे. यासंदर्भात व्यक्ती, परीक्षार्थी, विद्यार्थी तसेच संबंधित संस्थांनी आपली निवेदने १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करावीत, असे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी केले आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग गठित करण्यात आला आहे.

आयोगामार्फत औषध निरीक्षक परीक्षा गट-ब, २०२५; महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२५; महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा, २०२५; महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२५; महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा, २०२५; महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा, २०२४; अन्न व औषध प्रशासन सेवा मुख्य परीक्षा, २०२३; महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, २०२५ आणि महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, २०२५ या नऊ परीक्षांशी संबंधित प्रकरणांची चौकशी करण्यात येणार आहे.

निवेदनासोबत कागदपत्रे जोडणे आवश्यक

यासंदर्भात परीक्षार्थी, विद्यार्थी आणि अन्य व्यक्तींनी आपली निवेदने मराठी किंवा इंग्रजी भाषेत सादर करावीत. निवेदनासोबत वैध ओळखपत्राची प्रत तसेच कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. निवेदने आणि संबंधित कागदपत्रे आयोगाच्या कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यालयाचा पत्ता: अन्न व औषध प्रशासन भवन, दालन क्र. २०१, दुसरी मजला, बीकेसी बांद्रे, (पूर्व), मुंबई-५१.

तसेच निवेदनाची एक प्रत complaints.inquiryocomm.mpsc@maharashtra.gov.ग्ह या ई-मेलवरही पाठविता येईल.

चौकशी आयोगाकडे प्राप्त झालेली निवेदने, प्रतिज्ञापत्रे आणि संबंधित कागदपत्रे गोपनीय ठेवण्यात येणार आहेत. निवेदनांची छानणी करून संबंधित व्यक्तींना आयोगासमोर साक्षीदार संदर्भात निर्णय अधिकार आयोगाकडे राहणार असल्याचेही महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोगाचे सदस्य सचिव मुंढे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञानासह सर्वांगीण उपायांना प्राधान्य - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

मुंबई : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत २४ व्याहप्त्यापोटी गुजरात मधील बनासकांठा येथे आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील ९१ लाख १२ हजार ७६५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत १ हजार ८३५ कोटी रुपयांचा निधी थेट जमा केला. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र सरकारने आर्थिक सहाय्यावरोबरच विज्ञान, तंत्रज्ञान, सिंचन, पशुपालन आणि पूरक व्यवसायांना प्राधान्य देत असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थान येथून दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभाग घेतला. कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री मोदी म्हणाले, केंद्र सरकारच्या विविध धोरणांमुळे गेल्या काही वर्षांत देशातील शेतकऱ्यांना ५० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम मिळाली अथवा त्यांच्या खर्चात बचत झाली आहे. देशातील ८५ टक्क्यांपेक्षा अधिक असलेल्या लहान शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधीच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ४ लाख कोटी रुपये थेट बँक खात्यांत देण्यात आले आहेत.

जागतिक बाजारात खतांच्या किमती वाढल्यानंतरही केंद्र सरकारने त्याचा भार शेतकऱ्यांवर पडू दिला नाही. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने सुमारे १६ लाख कोटी रुपये खर्च केले. गेल्या १२ वर्षांत गहू आणि धान उत्पादक शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमतीच्या माध्यमातून २४ लाख कोटी रुपये देण्यात आले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून गेल्या दहा वर्षांत शेतकऱ्यांना २ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक भरपाई मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.

सिंचनावरील खर्च कमी करण्यासाठी पीएम कुसुम योजनेअंतर्गत आतापर्यंत सुमारे १२ लाख सौरपंप देण्यात आले आहेत. या पंपांमुळे शेतकऱ्यांची ८० कोटी लिटरपेक्षा अधिक डिझेलची बचत झाली आहे. याशिवाय अतिरिक्त बीज निर्मितीसाही शेतकऱ्यांना लाभ होत असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी स्पष्ट केले.

बदलत्या हवामानाशी सुसंगत बियाण्यांच्या सुमारे तीन हजार नव्या जाती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभाग

महाराष्ट्रातील ९१ लाख १२ हजार ७६५ शेतकऱ्यांना पीएम किसान निधीचे १ हजार ८३५ कोटी रुपये वितरित



शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असून, राष्ट्रीय गोकुळ अभियानातून देशी पशुधनाचे संवर्धन आणि वैज्ञानिक प्रजननाला चालना दिली जात आहे. पशूंना लाळ्या-खुरकुत रोगापासून बाचविण्यासाठी देशभर मोफत लसीकरण मोहीमराबविण्यात आली आहे. आतापर्यंत सुमारे १५० कोटी लसमात्रा देण्यात आल्या असून, ८ कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या पशुधनाला त्याचा लाभ झाला आहे. देशातील गाय आणि म्हशींचे प्रतिदिन सरासरी दूध उत्पादन २०१३-१४ मधील पाच लिटरपेक्षा कमी पातळीवरून आता सुमारे आठ लिटरपर्यंत वाढल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी नमूद केले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी आयोजित 'रन फॉर युनिटी'मध्ये नागरिकांनी, विशेषतः युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष सहकार्याने मुंबईच्या ऐतिहासिक वारसा संवर्धनाला चालना मिळणार

बाणगंगा, वरळी कोळीवाडा आणि शिवडी किल्ल्यात वारसा जतनासोबत महिला सक्षमीकरणावर भर

वैभव संगोपन योजनेंतर्गत शिवडी किल्ला आरपीजी फाउंडेशनकडे संगोपनासाठी; वरळी किल्ल्याच्या संवर्धनासाठीही प्रयत्न

मुंबई : मुंबईचा समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि लोकपरंपरांचा वारसा जतन करून तो पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष सहकार्याने वारसा संवर्धनाच्या उपक्रमांना चालना मिळत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वैभव संगोपन योजनेंतर्गत विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार आरपीजी फाउंडेशनने शिवडी किल्ला संगोपनासाठी दत्तक घेतला आहे. याच योजनेच्या माध्यमातून वरळी किल्ल्याच्या संवर्धनालाही चालना देण्याचे उद्दिष्ट आहे. ऐतिहासिक वास्तूंचे जतन, स्थानिक संस्कृतीचे दस्तऐवजीकरण, नागरी सुविधांमध्ये सुधारणा आणि स्थानिक समुदायांसाठी रोजगारनिर्मिती, अशा विविध अंगांनी मुंबईच्या वारशाचे जतन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आरपीजी फाउंडेशनचा उपक्रम असलेल्या 'द हेरिटेज प्रोजेक्ट'च्या माध्यमातून बाणगंगा, वरळी कोळीवाडा आणि शिवडी किल्ला या ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनासाठी संशोधन, जनसहभाग, सांस्कृतिक उपक्रम, पायाभूत सुविधांचा विकास आणि महिला सक्षमीकरणावर भर देण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत ५० हजारांहून अधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्यात यश आले असून, २७० हून अधिक महिलांना उपजीविका आणि उद्योजकतेसाठी सहकार्य करण्यात आले आहे.



वैभव संगोपन योजनेंतर्गत शिवडी किल्ल्याचे संगोपन

वैभव संगोपन योजनेंतर्गत शिवडी किल्ल्याचे संगोपन

मुंबईच्या पूर्व किनारपट्टीवरील ऐतिहासिक शिवडी किल्ला हा शहराच्या सागरी इतिहासाचा महत्वपूर्ण भाग आहे. या किल्ल्याचे ऐतिहासिक स्वरूप जतन करून त्याला नव्याने ओळख मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वैभव संगोपन योजनेंतर्गत आरपीजी फाउंडेशनने किल्ला संगोपनासाठी दत्तक घेतला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाच्या मान्यतेनुसार हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

किल्ल्याचा इतिहास, संस्कृती, पर्यावरण आणि मुंबईच्या सागरी वारशाशी असलेले नाते नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संग्रहालय आणि माहिती केंद्र विकसित करण्याचे नियोजन आहे. या माध्यमातून ऐतिहासिक स्थळाचे महत्व अधोरेखित होण्यासोबतच नागरिक आणि पर्यटकांना मुंबईच्या ऐतिहासिक वारशाचा अनुभव घेता येणार आहे.

वरळी किल्ल्याच्या संवर्धनालाही प्राधान्य

वैभव संगोपन योजनेच्या माध्यमातून वरळी किल्ल्याच्या संवर्धनासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत. वरळी कोळीवाड्यातील वारसा संवर्धनाच्या कामाचा किल्ल्यापर्यंत विस्तार करण्याचे उद्दिष्ट आहे. कोळी समाजाचा इतिहास, परंपरा, जीवनशैली आणि सांस्कृतिक ओळख जतन करून हा वारसा अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जात आहे.

वरळी कोळीवाड्यात ७१ हून अधिक पथदिवे, ३० हून अधिक माहितीफलक आणि सातहून अधिक सार्वजनिक भितिचित्रे उभारण्यात आली आहेत. यामुळे परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होण्यासोबतच कोळी समाजाच्या सांस्कृतिक वारशाला सार्वजनिक व्यासपीठ मिळत आहे.

कोळी महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन

वरळी कोळीवाड्यातील १२० हून अधिक महिलांना कौशल्यविकास आणि उद्योजकतेसाठी सहकार्य करण्यात आले आहे. 'शेफ्स ऑफ कोळीवाडा' या उपक्रमातून महिलांनी पारंपरिक कोळी खाद्यसंस्कृतीला नवी ओळख मिळवून दिली आहे. विविध खाद्य महोत्सव आणि प्रदर्शनांमधील सहभागामुळे त्यांच्या कौशल्यांना व्यासपीठ मिळत असून, स्थानिक परंपरांच्या जतनासोबत रोजगारनिर्मितीलाही हातभार लागत आहे.

बाणगंगा परिसराच्या सांस्कृतिक वारशाचे जतन

मुंबईतील ऐतिहासिक बाणगंगा तलाव परिसरात वारसा संवर्धनासोबतच या स्थळाचा इतिहास आणि सांस्कृतिक महत्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू आहे. या उपक्रमांतर्गत १५० हून अधिक महिलांना उद्योजकता, शिवणकाम आणि आरोग्यविषयक प्रशिक्षण देण्यात आले आहे. विविध कार्यक्रम आणि अनुभवात्मक उपक्रमांच्या माध्यमातून ५०० हून अधिक पर्यटकांनाही या वारसास्थळांशी जोडण्यात आले आहे.

वारसा संवर्धनातून सर्वसमावेशक विकास

मुंबईचा वारसा हा केवळ ऐतिहासिक वास्तूंपुरता मर्यादित नसून, स्थानिक समुदायांच्या परंपरा, कला, खाद्यसंस्कृती आणि जीवनशैलीतही तो जिवंत आहे. त्यामुळे वारसा संवर्धनासोबतच परिसरातील नागरी सुविधा सुधारणे, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आणि पर्यटनाला चालना देणे यांना महत्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वैभव संगोपन योजनेच्या माध्यमातून शिवडी आणि वरळी किल्ल्यांसारख्या ऐतिहासिक वास्तूंचे संगोपन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे सफल होताना दिसत आहे.

आर्वी शहरात 'मिशन कोंडीमुक्त वर्धा' अभियानाचा धडाका!

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर १०० कारवाया - वाहतूक शिस्तीसाठी पोलिसांची विशेष मोहीम

आर्वी । प्रतिनिधी



वाहतूक कोंडी दूर करून वाहतुकीला शिस्त लावण्यासह रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस विभागाच्या वतीने 'मिशन कोंडीमुक्त वर्धा जिल्हा' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत गुरुवारी २९ ऑक्टोबर रोजी आर्वी शहरात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार १०० कारवाया करण्यात आल्या. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले, आर्वी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सतीश डेहनकर तसेच जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखा, वर्धाचे प्रभारी अधिकारी सहायक विजयकुमार घुले यांच्या नेतृत्वाखाली संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदारांनी या मोहिमेत सहभाग घेतला. वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले. यावेळी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर टाळणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वाहनांची आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवणे आणि अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास न देणे, अशा महत्त्वाच्या नियमांची माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी सार्वजनिक रस्त्यांवर वाहने उभी करू नयेत. रस्त्यावरून प्रवास करताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे आणि रुग्णवाहिका तसेच इतर आपत्कालीन वाहनांना तातडीने मार्ग उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन पोलिसांनी केले.

आर्वी शहरात राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध १०० कारवाया करण्यात आल्या. यापुढेही नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलीस विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

६ नोव्हेंबर रोजी डाक अदालतीचे आयोजन

वर्धा : नागरिकांना दर्जेदार डाक सेवा उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या तक्रारीचे योग्य प्रकारे निराकरण करण्याच्या उद्देशाने अधीक्षक डाकघर, वर्धा विभाग, वर्धा यांच्या कार्यालयात ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.

डाक सेवेबाबत प्राप्त तक्रारीचे तीन आठवड्यांच्या आत निवारण झाले नसल्यास किंवा तक्रारीवर समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नसल्यास अशा तक्रारी डाक अदालतीमध्ये विचारात घेतल्या जाणार आहेत. विशेषतः टपाल, स्पीड पोस्ट, डाकवस्तू पार्सल, बचत बँक तसेच मनीऑर्डर यासंबंधीच्या तक्रारींचा डाक अदालतीमध्ये विचार केला जाणार आहे. तक्रारीमध्ये संबंधित प्रकरणाचा संपूर्ण तपशील, तक्रारीची तारीख तसेच ज्या अधिकाऱ्यांकडे मूळ तक्रार पाठविण्यात आली आहे, त्या अधिकाऱ्याचे नाव व इतर आवश्यक माहिती नमूद करावी. संबंधित नागरिकांनी डाक सेवेबाबतची आपली तक्रार दोन प्रतींसह अधीक्षक डाकघर, वर्धा विभाग, वर्धा यांच्या कार्यालयात, पहिला माळा, वर्धा - ४४२००१ या पत्त्यावर ३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अथवा त्यापूर्वी सादर करावी. डाक अदालतीमध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे डाक सेवांशी संबंधित प्रलंबित तक्रारी असलेल्या नागरिकांनी या डाक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधीक्षक डाकघर, वर्धा विभाग, वर्धा यांनी केले आहे.

फंडच्या नावाखाली दोन कोटी रुपयांने फसवणूक

वर्धा : फंडच्या नावाखाली रक्कम जमा करून परत न करता २ कोटी १ लाख ९४ हजार रुपयांनी फसवणूक केल्याचा प्रकार पुढे आला आहे. दयालनगर परिसरात ही घटना घडली. याप्रकरणी तक्रारीवरून वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, दयालनगर येथील घनश्याम बद्रीप्रसाद पांडे मागील दहा वर्षांपासून फंड चालवते. मागील ५ वर्षांपासून राकेश चंदन या फंडात दरमहा पैसे जमा करीत होते. त्यावर १२ महिने पूर्ण झाल्यानंतर तीन टक्के व्याज मिळत होते. व्यवहार सुरळीत सुरू होते. मात्र, १२ महिन्यांचे पैसे भरूनही सप्टेंबर महिन्यातील पैशाची नोंद डायरीत केली नाही. मुदत पूर्ण होऊनही जमा केलेली रक्कम परत मिळाली नाही. या फंडात राकेश चंदन यांच्यासह इतरही लोकांचे पैसे आहे. फंडच्या नावाखाली २ कोटी १ लाख ९४ हजार रुपयांनी फसवणूक केल्याचे तक्रारीत सांगण्यात आले. याप्रकरणी घनश्याम बद्रीप्रसाद पांडे उर्फ फुगलू पांडे, किरण घनश्याम पांडे, पायल पांडे ऊर्फ संजोग दुबे या तिघांविरोधात वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

विविध मागण्यांकरिता धरणे आंदोलन

शालेय पोषण आहार योजनेचे कंत्राटीकरण रद्द करण्यासह विविध मागण्या

वर्धा : शालेय पोषण आहार योजनेचे कंत्राटीकरण रद्द करण्यासह विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले. वर्धा जिल्हा शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना, अंगणवाडी पुरक पोषण आहार, महिला बचत गट संघटनेच्या वतीने हे धरणे आंदोलन सुरू करण्यात आले.



प्राधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना व अंगणवाडी पोषण आहार योजना राज्य स्कारचे शालेय शिक्षण विभाग व महिला बाल विकास विभाग चालविते. गेली अनेक वर्षे ह्या दोन्ही योजना राज्यात व्यवस्थित सुरु आहेत. वेतन-मानधन अत्यंत अनियमीत असतांनाही महिला हे काम गेली कित्येक वर्षापासून करीत आहेत. यामध्ये राज्यात वर्धा जिल्ह्यासह लाखो महिला हे काम करतात. त्यांचे रोजगारीचे हे साधन आहे. दरम्यान, कोणतीही तक्रार व कारण नसतांना दोन्ही योजनांचे खाजगीकरण करुन 'सेंट्रल किचन सिस्टीम' द्वारा कंत्राट देण्याचा निर्णय केला. केंद्र व राज्य सरकारचे खाजगीकरण धोरणाचा हा परिणाम असून सरकार लोकांना रोजगार देण्याकरीता की रोजगार काढून कंत्राटदाराचे घश्यात घालण्याचा हा निर्णय राज्य शासनाचा आहे, असा प्रश्न उपस्थित यावेळी करण्यात आला. या विरोधात वर्धा जिल्हा शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना, अंगणवाडी पुरक पोषण आहार, महिला बचत गट संघटनेच्या वतीने शासनाच्या या निर्णयाचा तीव्र निषेध, सिटूचे भैय्या देशकर, सुनिलधिमे, वैशाली मुंजेवार, शमीम पठाण, छबु चहांदे, शुभांगी कलोडे यांनी केला. ३० ऑक्टोबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयापुढे वर्धा येथे महिलांचे बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे.

--- आंदोलनाचे नेतृत्व अनिता राऊत, अनिता नेहारे, यशोधरा कांबळे, सोनु मोहदुरे, अर्चना पोटफोडे, आशा पवार, रेखा धनुकर, रंजना देशमुख, योगिता लोखंडे, रुखमा कठाणे, सुंदरबाई देशमुख, मंदा बानाईत, नंदा गोंडाने, सविता डहाके, वंदना तेलंग, रत्ना टापरे, प्रमिला हत्तीमारे, शकुंतला मेश्राम, शकुंतला अरगडे, छाया पावसेकर, नंदा जांभुळळकर, अनिता पाटील, परविन पठाण, प्रमिला वानखेडे आदींनी केले. यावेळी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

-- बेमुदत आंदोलन दरराेज सुरु राहणार आहे. याबाबत शासन-प्रशासन काय निर्णय घेते याकडे कामगारांचे लक्ष लागले आहे. निवेदनांत योजनांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करा, ५ जुलै २०२४ रोजी जाहीर केलेली १००० रुपये मानधन वाढ लागू करुन त्याचा अरीअर्स अदा करा, थकीत मानधन देयके आदा करा, आदी मागण्या करण्यात आल्या.

प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती व्याख्यानमाला आज





वर्धा : प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्ट, वर्धा द्वारा आयोजित प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती व्याख्यानमालेचे एकोणिसावे पुष्प शनिवार ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता, स्व. सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय, मगनवाडी, वर्धा येथे होणार आहे.

ही व्याख्यानमाला मागील २० वर्षांपासून अविरतपणे आयोजित केली जात आहे. यंदाच्या वर्षी सध्याच्या राजकीय परिस्थितीत अत्यंत ज्वलंत असलेल्या 'संविधान ते सत्ताकारण - लोकशाहीचा कसोटीचा काळ' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. या विषयावर पुणे येथील प्रसिद्ध राजकीय विश्लेषक डॉ. विभीषण चौधरी हे मुख्य वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी सेवाग्राम आश्रमचे सचिव विजय तांबे राहणार आहेत. कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्ट, वर्धा चे सचिव डॉ अभ्युदय मेघे व ट्रस्ट च्या सर्व सदस्यांनी केले आहे.

परसोडी व काकडा येथील शेतकऱ्याची नदीवरील वीजपुरवठा बंद

कारंजा घाडगे : वर्धा जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती आणि पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता कार नदीपात्रातील पाण्याचा उपसा नियंत्रित करण्याची मागणी पुढे आली आहे. ग्रामपंचायत काकडा/परसोडी अंतर्गत कार नदीपात्रात सिंचनासाठी लावण्यात आलेल्या विद्युत मोटार पंपांचा वीजपुरवठा तात्काळ बंद करण्याबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण विभागाला पत्र देण्यात आले होते आणि महावितरणने परसोडी आणि काकडा या तील शेतकऱ्यांच्या नदीवर असणारे मोटर पंपाची लाईन बंद केली

कार नदीच्या पाण्यावर परिसरातील गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे अवलंबित्व आहे. मात्र, नदीपात्रातून शेतीसाठी

नागपूर जिल्ह्यात विद्युत पुरवठा सुरू शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट ग्रामपंचायतीचे वीज वितरण विभागाला पत्र

मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा होत असल्याने पाणीपातळी कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याचा परिणाम गावातील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

सध्या जिल्ह्यात दुष्काळ आणि पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत कार नदीपात्रातील पाण्याचा अनियंत्रित उपसा झाल्यास पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर नदीपात्रात सिंचनासाठी लावण्यात आलेल्या विद्युत पंपांचा वीजपुरवठा तात्काळ बंद करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी संबंधित पत्रातून करण्यात आली . कारंजा येथील वीज वितरण कंपनीने काकडा परसोडी परिसरातील नदीवरील मोटर पंप बंद केले आहे.

पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्या!

दुष्काळी परिस्थितीत शेतीसाठी पाण्याची गरज महत्त्वाची असली, तरी गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ नये, यासाठी प्रशासनाने योग्य समन्वय साधून तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नदीवरील मोटर पंप यावाबत शेतकऱ्यांमध्ये मोठ्या संतापाची लाट पसरलेली आहे कारण वर्धा जिल्ह्यातील महावितरण कंपनीने संपूर्ण नदीवरील मोटर पंप बंद केले



शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत बिकट होत चाललेली आहे याबाबत शासनाने ही निर्णय घ्यावला सुरुवात केलेली आहे कारंजा येथील महावितरण कंपनीच्या कार्यालयाने काकडा परसोडी हे वर्धा जिल्ह्यात येत असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे पूर्णपणे वीज कनेक्शन तोडलेले आहे मात्र नागपूर जिल्ह्यामध्ये सर्रास नदीवरील मोटर पंप सुरू असल्यामुळे गावातील शेतकऱ्याची संतापाची लाट निर्माण झालेली आहे वर्धा जिल्ह्याला एक नियम आणि नागपूर जिल्ह्याला एक नियम अशी परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे लवकरात लवकर नागपूर जिल्ह्यात ती लिही नदीकाठच्या मोटर पंप बनतात करण्यात यावी अशी मागणी माजी उपसरपंच वाल्मीक ठाकरे काकडा यांनी दिलेली आहे तरी संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन त्वावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे

मात्र नागपूर जिल्ह्यातील सुरू का? हा प्रश्न निर्माण असल्यामुळे हा दुजाभाव झालेला आहे

भारत पशुधन प्रणालीवर माहिती अद्ययावत करण्याचे आवाहन

वर्धा : राज्यातील दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या ३०४ तालुक्यांमध्ये पशुधनाचे योग्य संगोपन आणि संवर्धन करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने विशेष नियोजन केले आहे. दुष्काळाच्या काळात पशुपालकांना चारा, चारा बियाणे, चारा ठोंबे आणि पशुवैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक मदत मिळावी, यासाठी 'भारत पशुधन' प्रणालीवर पशुधनाची अद्ययावत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गरज असलेल्या पशुपालकांपर्यंत सर्व प्रकारची मदत पोहोचवणे अधिक सुलभ होणार आहे.

त्यामुळे सर्व पशुपालकांनी नोंदणी व टॅगिंगची कार्यवाही तातडीने पूर्ण करून या अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाची नोंदणी तत्काळ अद्ययावत करावी. घोषित केलेल्या ३०४ तालुक्यांमध्ये पशुधनाचे योग्य संगोपन आणि संवर्धन टॅगिंग करून त्याची नोंद प्रणालीवर करणे आवश्यक आहे. यासाठी पशुपालकांनी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून नवीन पशुधनाच्या कानाला १२ अंकी ओळख क्रमांक आवश्यक असलेला बिल्ला(टॅग)बसवून नोंदणी पूर्ण करून घ्यावी.या डिजिटल नोंदणीमुळे आपत्कालीन परिस्थितीत अद्ययावत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गरज आणि योग्य दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना आणि मदतीचा लाभ पात्र पशुपालकांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचवण्यासाठी ही नोंदणी आहे. मोहिमेत सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त किरण पाटील यांनी केले आहे.